# ज्ञान आणि विज्ञान

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८५०

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

RFFBK-0006845

— रमातनय

# ज्ञान आणि विज्ञान

(प्रा. माटे यांच्या 'विज्ञानबोधा'च्या प्रस्तावनेची दुसरी बाजू)

लेखक :

**रमातनय**

'ओघळलेलें मंगळसूत्र', 'समाजजीवन', 'वंदनीय महाशय'
या पुस्तकांचे कर्ते

एकमेव विक्रेते



RFFBK-0006845

कान्टिनेन्टल प्रकाशन

विजयादशमी १८६९ ] [ मूल्य एक रुपया

( सर्वाधिकार लेखकाधीन )

मुद्रक प्रकाशक— लक्ष्मण नारायण चापेकर, 'आर्यसंस्कृति मुद्रणालय',
१९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ज्ञान आणि विज्ञान

- उपोद्घात
- इतिहासाच्या मर्यादा
- अध्यात्माची उपेक्षित बाजू
- भौतिक प्रगतीचें परीक्षण
- शास्त्रांची अशास्त्रीयता
- अधिष्ठानच निराळें हवें.

# उपोद्घात

सुमारें बारा वर्षांपूर्वी 'विज्ञानबोध' प्रथम माझ्या हातीं पडला. त्यांतील विविध शास्त्रांची एकत्र दिलेली माहिती वाचून ती उद्बोधक वाटली तशीच मनोरंजकहि वाटली. ग्रंथ चाळीत असतां दोनशे पानांचा प्रस्तावनाखंडहि डोळ्यांखालून जाण्यास चुकला नाहीं. त्याच वेळीं या प्रबंधाबद्दल उलट सुलट विचार डोक्यांत घोळूं लागले. परंतु ते लिहून काढण्याची कल्पना तेव्हां नव्हती. त्या पहिल्या वाचनानें त्या प्रस्तावनेविषयीं व त्याच्या लेखकाविषयीं जो ग्रह झाला तो अद्यापिहि बहुतांशीं कायम आहे. प्रथमेची गोष्ट म्हणजे असलें तात्त्विक वाङ्मय दुष्काळांत उगवलेलें पाहून त्या अंकुराचें व त्याच्या माळ्याचें साभिमान कौतुक वाटलें. स्वतंत्र विचारप्रणाली व स्वतंत्र शैली ही दुसरी महत्त्वाची गोष्ट.

तथापि बऱ्याचशा विचारांत मतभेद होता हें निःसंशय. पण जेव्हां यंदा इंटर सायन्सच्या माझ्या एका मित्रानें या प्रस्तावनेचें गौडबंगाल मला विचारलें तेव्हां तो प्रबंध पुन्हा व्यवस्थित वाचला. आणि त्याची दुसरी बाजू शक्य असल्यास मांडावी अशी इच्छा झाली. निबंध समजावून देतांना बऱ्याचशा मुद्यांवर चर्चा होऊन शेवटीं हें चोपडें लिहून काढलें.

प्रा. माटे यांच्या 'विज्ञानबोधा'ची प्रस्तावना आज चवदा वर्षें गाजून राहिली व यापुढेंहि ती बहुतेक तशीच गाजत राहील. प्रथमेची गोष्ट म्हणजे मराठींत तात्त्विक वाङ्मयाचा अद्यापिहि दुष्काळच आहे. सध्या थोडें फार वैचारिक वाङ्मय कोठें कोठें दृष्टोत्पत्तीस येतें. परंतु त्यांत स्वतंत्र बुद्धि आणि स्वतंत्र वाङ्मय यांचा बहुधा अभावच असतो. अशा स्थितींत विज्ञानबोधाच्या प्रस्तावनेनें महाराष्ट्रीय विचारांत बरेंच प्रवर्तन घडवून आणलें आहे; निदान विचारप्रवर्तक म्हणून तरी त्या प्रबंधाची गणना केली जाईल. शैलीचें वैशिष्ट्य,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

भाषेची सुबोध व रसाळ लकब, चैतन्यक्षमता, विचारांची तात्त्विकता आणि स्वतंत्रता, अष्टपैलू विद्वत्ता आणि समाजाविषयींची कळकळ या दुर्लभ गुणांनीं महाराष्ट्रवाङ्मयांत ही प्रस्तावना भूषण होऊन बसली आहे यांत शंका नाहीं.

जगाचा दैनंदिन ताजा इतिहास लक्षांत घेतला म्हणजे भारतीयांना केवळ जपमाळेनें सरसर पुढें जातां येईल असें वाटत नाहीं. आणि भोंवतींची परिस्थिति जाणून भौतिक शास्त्रांचा जोमानें पुरस्कार करून आधुनिक जगाला तोंड देणें भाग आहे. त्यासाठीं विद्यालयांतून या शास्त्राचें शिक्षण होऊन संशोधक म्हणून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे. पण तत्पूर्वी आपण आपल्या जुन्या कल्पना व रूढी सोडून नवीन संशोधनास आड येतील अशीं सर्व तत्त्वें, समाजरचना, धर्म, ध्येयें इत्यादि गोष्टींचा त्याग करावयास हवा. पण एवढें करून आम्ही निष्प्रभ म्हणून आम्हांला मान खालीं घालण्याचें कांहींच कारण नाहीं; आणि एवढ्यासाठीं पाश्चात्त्यांकडे तोंड वेंगाडण्याची आवश्यकताहि नाहीं. प्राचीन काळीं आम्हींहि आजच्या पाश्चात्त्यांप्रमाणेंच प्रगति केली होती व ती आज काळाच्या कपार्टी गडपली गेली आहे. तिचें उत्खनन करून जुन्या विद्यांच्या संशोधनानें आम्हांला आमचें सद्यःकालीन साध्य साधावयाचें आहे.

विज्ञानबोधाच्या प्रस्तावनेचा हा दृष्टिकोन केव्हांहि स्वागतार्हच आहे. पण हा दृष्टिकोन सांगूनच प्रा. माटे थांबलेले नाहींत. तें विधान सिद्ध करण्याकरितां त्यांना बराच खटाटोप करावा लागला. जुन्या कल्पनांना सोडून देऊन विचारांना शास्त्रप्रवण करण्याकरितां प्रथम भारतीय तत्त्वज्ञानावर त्यांनीं आघात केला आहे. आमचे तत्त्वज्ञ आम्हांस संसार सोडावयास सांगतात; जग दिसतें तें खोटें आहे, क्षणिक आहे, आमच्या तत्त्वज्ञान्यांत एकमत होत नाहीं; एकदां सांगतात सामाजिक उन्नति करून घ्या तर दुसऱ्यांदा सांगतात

जग हें क्षणभंगुर आहे; तेव्हां पारमार्थिक उन्नति हीच खरी उन्नति; व या सर्वांचें तात्पर्य एवढेंच कीं जग हें जड आहे, म्हणून त्याचा तिरस्कार करा.

भौतिकशास्त्रांचा पुरस्कार करतांना वरीलप्रमाणें आध्यात्मिक तत्त्वांचें विडंबन करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. अशा तऱ्हेचें विडंबन जनतेंत झालें यांत वाद नाहीं. तथापि त्यावरून मूळ तत्त्वज्ञान दोषी ठरत नाहीं. कारण विडंबन होणें निसर्गधर्मच आहे. आजमितीस सर्व प्रकारच्या तत्त्वाचें विडंबन होत आलें आहे; परंतु विडंबनाच्या नांवाखालीं मूळ तत्त्वज्ञानाची टीका करणें योग्य होणार नाहीं. कारण विडंबनावरील टीकेनें मूळ तत्त्वज्ञानास कांहींच धोका उत्पन्न होत नाहीं. तथापि तशी टीका करणारा मात्र निर्दोषी म्हणून सुटूं शकत नाहीं. प्रो. माटे यांनीं केलेली टीका ही विडंबनावर असल्यामुळें अध्यात्माचें तत्त्व खोडलें गेलेंच नाहीं. हीच टीका जनतेस उद्देशून असती तर तेथें वादाचें कारणच नव्हतें. परंतु रोख आहे तो तत्त्वज्ञानावर आहे; लोकांवर नाहीं. तथापि प्रा. माट्यांनीं घेतलेले आक्षेप कांहीं नवीन नाहींत. आणि त्यांच्याचप्रमाणें पुष्कळांचा असा समज आहे कीं, आमचें तत्त्वज्ञान उदासवाणें आहे. त्या दृष्टीनें प्रस्तुत निबंधांत थोडासा विचार केला आहे.

असो. निबंधावर चर्चा करतांना जे विचार सुचले ते लिहून काढले. परंतु यानें माझें समाधान झालें नाहीं. विषयाची व्याप्ति फार मोठी तसेंच महत्त्वहि फार मोठें आहे. त्या दृष्टीनें हें ' ज्ञान आणि विज्ञान ' मला बरेंच उथळ वाटतें. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मात्र 'विज्ञानबोधाच्या प्रस्तावने'च्या दुसऱ्या बाजूकडे अंगुलिनिर्देश केल्यासारखें होईल असें वाटतें. पण तेवढ्यानें मूळ विषय माझ्या डोक्यांतून मोकळा होण्यासारखा नाहीं. ही प्रबंधिका भावी ग्रंथाची रूपरेषा समजली तर जास्त संयुक्तिक होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ५.७...
विभाग
क्र.
नों. दि.
६६९५

# १ : : : इतिहासाच्या मर्यादा

## हिंदुस्थान आणि जग :

बरेच वेळां असें दिसून येतें कीं पाश्चात्य संस्कृतीचा पुरस्कार करतांना व विशेषतः भारतीय संस्कृतींतील दोषाविष्करण करतांना भारतीय संस्कृतीला आधारभूत असलेलें भारतीय अध्यात्म कनिष्ठ प्रतीचें ठरवितां यावें, म्हणून त्याच्याशीं कोणताहि संबंध नसलेला भारतेतर जगाचा इतिहास निवडक उदाहरणांसह पुढें करण्यांत येतो. वास्तविक हिंदुस्थानचा इतिहास व जगाचा इतिहास यांत भेद केला पाहिजे. हिंदुस्थानचा इतिहास जगाच्या इतिहासाहून फार भिन्न आहे. हिंदुस्थानांतील सिद्धान्त सिद्ध करण्यास जगाच्या इतिहासाचा तितकासा उपयोग होत नाहीं; कारण हिंदुस्थानचा गेल्या सात आठ हजार वर्षांचा इतिहास विशिष्ट संस्कृतीनें भरगच्च भरलेला आहे. हिंदुस्थानची भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थिति फार भिन्न आहे. हिंदुस्थानचें स्वतंत्र असें तत्त्वज्ञान उगम पावून आज सुमारें पांच सात हजार वर्षें झालीं. त्यावर बऱ्याच सुधारणा-संस्कार होऊन त्यांनीं सबंध समाजच्या समाज आपल्या छत्राखालीं आणला. या सबंध इतिहासांत सांस्कृतिक एकसूत्रीपणा होता. इतर जगाचा उदय त्या मानानें फार उशीरां, फार भिन्न काळीं, भिन्न स्थळीं, भिन्न समाजांकडून भिन्न मार्गांनीं झाला आहे. त्या सर्वांत एक-

सूत्रीपणा, सुसंगतपणा असा कोठेंच नाहीं. इजिप्त व चीन याला अपवाद असले तरी बहुधा धार्मिक आणि सामाजिक विषयांत या देशांशीं तुलना न करतां ती याच विषयांत अयशस्वी झालेल्या युरोपशीं करतात. प्रा. माट्यांनींहि त्यांच्या निबंधांत नेमकें हेंच केलें आहे. अध्यात्मप्रवण भारतीय धर्मसंस्था मुळांतच दोषी ठरविण्या-करितां अशुद्ध पाया असलेल्या व शेवटीं अशुद्ध स्वरूप झालेल्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांचें उदाहरण त्यांनीं प्रमाण मानलें आहे. अशा तऱ्हेचीं ऐतिहासिक उदाहरणें देऊन भारतीय अध्यात्मतत्त्वज्ञानाची प्रा. माटे यांनीं परीक्षा केली आहे. परंतु युरोपचा धार्मिक इतिहास आणि भारतीय तत्त्वज्ञान यांत कार्यकारणभाव तर नाहींच पण कसलाच संबंध नाहीं. ख्रिस्ती धर्मसंस्था भ्रष्ट झाली म्हणून भारतीय धर्मतत्त्व मूलतःच अग्राह्य होतें असें नाहीं. अशा प्रकारचें सिद्धान्त-प्रतिपादन तर्कशुद्ध नाहीं. युरोपमध्यें धर्माच्या नांवाखालीं शास्त्र-ज्ञाचा छळ झाला तर त्याचा संबंध हिंदुस्थानांतील अध्यात्मतत्त्वाशीं कुठें येतो ? तेथें धर्माच्या नांवावर वाटेल तो अविवेक चालत होता. त्याला हिंदुस्थानांतील आर्यांचा धर्म कितपत जबाबदार आहे ? हिंदूंचें अध्यात्मतत्त्वज्ञान व इतर धर्मांचें तत्त्वज्ञान यांचा कांहींहि संबध नाहीं. इतर धर्मांच्या खुळेपणाला हिंदुधर्म जबाबदार कसा धरतां येतो ? तात्पर्य, हिंदुस्थानच्या इतिहासाच्या सामग्रीवरच येथील समाजाबाबत सिद्धान्त काढतां येतील.

## इतिहास हें एक अपुरें शास्त्र आहे !

ऐतिहासिक घटनांवरून तात्त्विक सिद्धान्त कधीं सिद्ध करतां येतो काय ? ऐतिहासिक घटनांना सिद्धान्ताचीं साधनें मानलीं तर तीं कितपत शास्त्रीय मानतां येतील ? हीं साधनें जणु कांहीं शास्त्रीय समजून सिद्धान्तांत तीं प्रमाण म्हणून पुढें करण्याची

बरीच प्रथा दिसते. इतिहासांत एखादी घटना घडली तरी मानवी जीवनांत ती त्रिकालाबाधित सत्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून इतिहासाचे दाखले देऊन अमुक एक गोष्ट चांगली आहे किंवा वाईट आहे म्हणणें अथवा तिच्याविषयीं अमुक एक गुणधर्म निश्चित सांगणें योग्य होणार नाहीं. ऐतिहासिक घटना दोन प्रकारच्या आढळतात. एक निसर्गनिर्मित; दुसरी मनुष्यनिर्मित. यांमध्यें मनुष्य किंवा निसर्ग तर्कशुद्ध क्रिया करीलच असा नियम नाहीं. सदसद्विवेकबुद्धीचा निम्म्या ठिकाणीं उपयोग केला जात नाहीं असेंच एकंदर जगाच्या इतिहासावरून दिसतें. ज्या बाबतींत तर्कशुद्धतेचा आधार नाहीं त्या बाबतींत शास्त्राचा शिक्का कसा मारतां येईल ? इतिहास हा तर्कशुद्ध घटनांपेक्षां योगायोगांनींच अधिक भरलेला आहे. ऐतिहासिक योगायोग लहान असला तरी त्याचा परिणाम तेवढ्याच घटनेपुरता न रहातां त्यामुळें भावी इतिहासास कलाटणीहि मिळूं शकते. करितां, योगायोग कितीहि लहानमोठ्या प्रमाणांत असला तरी त्याला दुर्लक्षून चालत नाहीं. ज्या घटना मानवी तर्कशुद्धतेनें प्रेरित झाल्या त्यांची तार्किक भूमिका वैयक्तिक असून ती अनियमित गुणदोषांनीं परिपूर्ण आहे. गझनीच्या महंमुदाच्या स्वाऱ्या, पृथ्वीराजाची क्षमाशीलता, फिरोझखानाची शांत व सुधारणप्रचुर कारकीर्द, क्रूर, संशयी व कावेबाज औरंगजेब, मुत्सद्दी अकबर, बाबराचें हिंदुस्थानांत आगमन, थोरल्या माधवरावाचा अपमृत्यु, विश्वासरावाचा युद्धांतील वध, फितुरीनें मान खालीं घातलेल्या दुतर्फा मराठ्यांच्या नंग्या तरवारींच्या मधून निसटून जाणारा एल्फिन्स्टन, शिंदे, होळकर, भोसले यांचें आत्मघातकी विघटन, हजारों शिपायांची कत्तल करून कलिंगला विजय मिळविणारा जयोत्तर शांतिदूत सम्राट् अशोक; जगाच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास नेपोलियनची इजिप्तवर स्वारी, आज जगाच्या आघाडीवर असलेल्या अमेरिकेचा अनायसा शोध लावणारा कोलंबस,

सुमारें पन्नास वर्षांपूर्वीचें अमेरिकेकडून जपानचें झालेलें उदयन, फ्रेंच राज्यक्रान्ति, कार्ल मार्क्स, नेलसनचा नेपोलियनवर विजय, आजच्या पाश्चात्य संस्कृतीच्या मुळाशीं असलेलें पराभूत कॉन्स्टँटिनोपल, पालथ्या घागरीवर पाणी झालेलें बर्कचें तत्त्वज्ञान, इत्यादि अनन्त घटना हे योगायोगच नव्हेत काय ? या योगायोगांमुळेंच इतिहासाला वळणें वळणें घ्यावीं लागलीं.

या घटनांच्यामागें कांहीं निश्चित योजना असते काय ? त्यांना कर्त्यांची सदसद्विवेकबुद्धि कितपत जबाबदार असते ? म्हणजे, जें घडतें तें वास्तविक घडावयास हवें होतें तेंच घडतें असें होत नाहीं ना ? मग असें ज्या ठिकाणीं 'वास्तविक' घडत नाहीं त्याचा भविष्यत् कालांतील सिद्धान्त काढावयास काय उपयोग होणार ? जगाच्या इतिहासांत अगदीं सूक्ष्मापासून फार मोठ्यापर्यंत अनंत योगायोग होऊन गेले ते घडले नसते वा घडले असते तर त्या त्या देशाचाच काय पण सर्व जगाच्या इतिहासालाच कलाटणी मिळाली असती. अशा या योगायोगांवर तर्कसिद्ध सिद्धान्त बठेल कसा ? एवढेंच म्हणतां येईल कीं एकंदर योगायोगाचा अवतार किती प्रकारांनीं जन्मास येतो, एवढें निश्चित कळेल. व त्यावरून मनुष्यानें सदसद्विवेकपूर्वक क्रिया केली नाहीं तर कोणत्या योगायोगांचा संभव आहे हें ढोबळ मानानें जाणतां येतें. पण मनुष्यानें सदसद्विवेकबुद्धि सोडून द्यावी हें काय म्हणून गृहीत धरावें ? आणि, 'अहो ! हें घडणारच असें इतिहास स्पष्ट सांगतो' असें म्हणून दैवाधीन व्हावें हें आजच्या विचारी माणसास शोभण्यासारखें नाहीं. किंबहुना इतिहास हें पुढील चुका सुधारण्याचें उत्तम साधन आहे. इतक्या प्रकारांनीं चुका व त्यांचे परिणाम होऊं शकतात याचा तो तक्ता आहे.

अनुक्रम ७०४.१
विभाग ...
क्रमांक
नों. दि. २८.१२



## आमचें ' दुतोंडी तत्त्वज्ञ ' :

एकीकडे जगाला स्थैर्य देण्याचीं तत्त्वें ते प्रतिपादन करीत व दुसरीकडे जगाची क्षणभंगुरताहि लोकांस पटवून देत. प्रा. माटे यांच्या म्हणण्याप्रमाणें ( वि. प्र. पृ. २७ ) हिंदु तत्त्वज्ञांचा हा दुतोंडीपणाचा मोठा दोष आहे. हिंदुधर्म बुद्धिमान् सुशिक्षितांसहि समजण्यास किती कठीण आहे हें यावरून स्पष्ट होतें. कोणत्याहि चार वस्तू एकत्र आणून त्यांची गोधडी करण्यापेक्षां त्यांच्यांतील एकसूत्रता ओळखून त्यांची सुसंगति लावून दाखविणें याला महत्त्व आहे. वस्तू गोळा करणें सोपें आहे. आन्तःसूत्र तोडून टाकल्यावर, ' हें बघा, कसें छिन्नविच्छिन्न आहे, एकाचा दुसऱ्याशीं संबंध नाहीं, ' अशी आपणच आरडाओरड केल्यावर नवख्याला असलेल्या सुसंगतींतहि विसंगति दिसूं लागेल. कोठें तरी कानावर गेलें कीं, ' जग मिथ्या आहे ' आणि ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् '. तेव्हां हिंदुधर्मांत हें असें दुतोंडी तत्त्वज्ञान आहे हें म्हणणें नवख्याला किंचित् काळ का होईना पण खरें वाटेल. परंतु जो हिंदु आहे त्याला हें समजण्यासारखें आहे कीं भिन्न भिन्न काळांत म्हणजे सुमारें पांचसहा हजार वर्षांत निरनिराळया परिस्थितींत निरनिराळे संत व अवतार झाले. त्यांनीं त्या त्या कालीं परिस्थिति ओळखून पर-

चक्रास तोंड दिलें व समाजाचें रक्षण केलें. ज्या काळांत आत्मानात्म्याचें तत्त्वज्ञान लिहिलें गेलें त्या उपनिषदांच्या काळांत समाज अत्यंत सुटसुटीत, सुखी, शांतताभोगी व निश्चिन्त होता. अन्नपाण्याची सुबत्ता, परकयांपासून भय नाहीं, समाजांत निरनिराळे प्रश्न अद्यापि उद्भवले नाहींत, अशा स्थितींत ब्रह्मज्ञानास सवड मिळून तें तत्त्वज्ञान शोधलें गेलें. सुमारें हजार वर्षांनंतर महाभारतीय तत्त्वज्ञान जन्मास आलें. या कालांत समाजांत इतर संस्कृतींचें मिश्रण होत होतें. अंतर्गत प्रश्न उपस्थित झाले होते. लोकसंख्या वाढून व्यापारउद्योग वाढला होता. नवीन समाज येऊन मिळाले होते. आपापसांत वाद उत्पन्न होऊन सामाजिक प्रश्नांना वाचा फुटूं लागली होती. त्याप्रमाणें परिस्थितीनुरूप तत्त्वज्ञानास नवीन वाटा फुटत होत्या. अर्थात् महाभारत हें नीति आणि ऐहिक जगांतील कर्तव्य एवढ्यासाठीं झालें. नंतरच्या पौराणिक काळांलाहि त्याच्या दृष्टीनें महत्त्व आहे. पुराणें हा इतिहास, कीं परकया समाजाचें आमच्यांत सामावूं पाहणारे धर्मग्रंथ, कीं केवळ पंचतंत्राप्रमाणें नीतिबोध हा वाद सध्या बाजूस ठेवला तरी पुराणांनींसुद्धां समाजजीवनाच्या प्रगत्यर्थ मोठें कार्य केलें होतें. 'जगाचा जड म्हणून तिरस्कार करणारे' शंकराचार्य यांनीं बौद्धांच्या शब्दांतच त्यांना प्रत्युत्तर देऊन समाजच्या समाज परत आपल्या धर्मांत खेचून घेतला. हें कार्य कालाच्या कपाटींहि न गडपण्यासारखें आहे. शंकराचार्यांच्या पुढें बऱ्याच शतकांनीं ज्ञानेश्वर नामदेवादिकांनीं संस्कृतांतील गूढ धर्म प्राकृतांत आणून बहुजनसमाजास धर्माविषयीं आपुलकी निर्माण केली. भक्तीच्या सुलभ बैठकीवर धर्मसाधन सोपें केलें. समाजांत सुसंघटितपणा आणला. आणि मुसलमानी आक्रमणास प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणें जनतेंत सामर्थ्य व आत्मविश्वास उत्पन्न केला. सुमारें १७ व्या शतकाच्या सुमारास तुकारामादि संतांनीं पूर्वींच्याच संतांचें कार्य पुढें चालवून मुसलमानी आक्रमणापासून हिंदु समाजास वाच-

विलें, रामदासस्वामींचें कार्य तेंच पण भिन्न मार्गानें होतें. हिंदुस्थानच्या इतिहासांत सम्राट अशोक, राणाप्रताप, शिवाजी, थोरला माधवराव, इत्यादि वीरांचें जें स्थान आहे तेंच स्थान समाजजागृतीच्या व पर्यायानें राष्ट्रीय उत्थापनाच्या क्षेत्रांत सुरदास, मिराबाई, नानक, कबीर, विद्यारण्य, ब्रह्मेन्द्र व वर उल्लेखलेले सर्व संत सर्वांत द्यावयास हवें. प्रथमपासून म्हणजे उपनिषद्कालापासून आजपर्यंतच्या या सहा–सात हजार वर्षांच्या काळांत सुखी समाज, गुंतागुंतीचा, लोकसंग्राहक, आपसांतील भांडणांचा समाज, अनेक संस्कृती मिळून वर्धमान होणारा समाज, निरनिराळीं दैवतें, तत्त्वें व आचार घेऊन निरनिराळ्या संस्कृतींना आपल्यांत घेणारा समाज, बुद्धधर्माच्या लाटेला बळी पडणारा समाज, मुसलमानांच्या स्वाऱ्यांनीं व नंतर घरांतच बस्तान ठेवलेल्या मुसलमान संस्कृतीला तोंड देणारा समाज इतक्या असंख्य अवस्था या समाजाच्या झाल्या. प्रत्येक अनवस्थेंतून समाजाचें स्थैर्य राखण्यासाठीं तत्कालीन लोक ज्या वृत्तीचे व आक्रमण ज्या प्रकारचें असेल त्याप्रमाणें मार्ग भिन्न राहतील. म्हणून हिंदु तत्त्वज्ञानाला सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमि ही महत्त्वाची गोष्ट आहे हें विसरून चालणार नाहीं. इतर धर्मांत आणि हिंदु धर्मांत हा भेद आहे. एकच तत्त्वोपचार सर्व काळीं सर्व परिस्थितींत लागू पडत नाहीं. हें तत्त्व मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध यांनीं ओळखलें नाहीं. त्यामुळें त्यांच्या तत्त्वज्ञानांत व सामाजिक तत्त्वांत प्रगति होऊं शकली नाहीं. हिंदुधर्मावर जितकीं परचक्रें आलीं तितकीं इतर कोणत्याहि धर्मावर आलीं नाहींत, त्यामुळें त्यांची कसोटी हुकली. तथापि सामाजिक तत्त्वज्ञानाविषयीं ते समाज अद्याप अस्थिर आहेत. सहिष्णुता, सर्वसंग्राहकता, प्रगतिशील तात्त्विक भूमिका व परिस्थितीप्रमाणें मूलतत्त्व कायम ठेवूनच–परिस्थितीला जुळवून घेण्याची पात्रता या कारणांमुळें हिंदु तत्त्वज्ञान दुतोंडीच काय पण असंख्यतोंडीहि दिसेल,

असंबद्धताहि वाटेल, आणि गुंतागुंतीचें फाफटपसाऱ्याचेंहि असेल. परंतु यांतच धर्माचें वैभव आहे. कारण त्यांत विचारस्वातंत्र्य आहे, तत्कालीन लोकांच्याबरोबर होऊन त्यांना आपल्यांत खेंचून घेण्याचें सामर्थ्य आहे, असहिष्णुता नाहीं, संग्राहकता आहे. आध्यात्मिक व सामाजिक तत्त्वज्ञानांत प्रगतीला वाव आहे. तें तळ्यासारखें सांठीव, मर्यादित पाणी नाहीं. नदीसारखें एकच पाणी, पण प्रवाही व निरनिराळ्या प्रदेशांची संभावना करणारें आहे. पाणी एकच. पण सांठीव झालें म्हणजे जंतुदूषित होतें व तेंच प्रवाही झालें म्हणजे जंतुरहित शुद्ध होतें.

## अध्यात्म आणि ऐहिक कर्तव्य :

याप्रमाणें हिंदु धर्माच्या उपर्युक्त लवचिक स्वभावाप्रमाणें हिंदु-तत्त्वज्ञानास निरनिराळीं वळणें लागलीं हें कांहीं खोटें नाहीं. परंतु परिस्थित्यनुरूप आवश्यक तो वरवरचा भाग सोडला तरी तत्त्वज्ञानाच्या गाभास यत्किंचित्‌हि फरक झालेला नाहीं. अध्यात्माचीं मूलभूत तत्त्वें चिरंतनच आहेत. त्यांत विसंगति नाहीं. फक्त त्या सूत्रमय मूलभूत तत्त्वांचें स्पष्टीकरण स्वरूपभिन्न झालें आहे. एकाच ब्रह्मसूत्रांतून वा गीतेंतून रामानुज, मध्वाचार्य, शंकराचार्य, ज्ञानेश्वर इत्यादिकांनीं निरनिराळे अर्थ काढले पण त्यांत कुठें विचारस्वातंत्र्य तर कुठें समाजाभिमुखता दृष्टोत्पत्तीस येते. त्यांचें विडंबन अज्ञांनीं व विरोधकांनीं केलें आहे. शांकरभाष्य हें या पकडींतून सुटूं शकलें नाहीं. 'जग हें तिरस्करणीय जड आहे' हा त्याचाच परिपाक आहे. विज्ञानबोधाच्या प्रस्तावनेंत या विडंबनावर टीका आहे. प्रस्थानत्रयी हें अफाट पसरणाऱ्या बुद्धीला नियमन करणारें मोठेंच सूत्र समजलें पाहिजे.

अनेक वर्षांच्या कालानंतर बहुजनसमाजांत तत्त्वज्ञानाचा अपभ्रंश झाला आहे यांत वाद नाहीं, पण तें अपभ्रष्ट तत्त्वज्ञान प्रमाण म्हणून गृहीत धरून त्या भ्रष्टाकारावरच टीका केली जाते. सर्वांत पहिला मुख्य आक्षेप म्हणजे हिंदु तत्त्वज्ञान जगाविषयीं उदासीन आहे. पण अध्यात्माचें शास्त्र हें त्याच्या अपभ्रंशाहून फार भिन्न आहे हें लक्षांत घ्यावयास हवें. अध्यात्म संसारांत उदासीन राहण्यास कधींच आणि कोणासहि सांगत नाहीं. सर्वसंगपरित्याग करणाऱ्या संन्याशालाहि 'लोकसंग्रह' (गीता) हें ऐहिक कर्तव्य घालून दिलें आहे. उदासीनतेची शिकवण असलीच तर ती परार्थापुढें स्वार्थाविषयीं आहे. तथापि गृहस्थाश्रमांत परार्थनिरपेक्ष स्वार्थ अभिप्रेत असतां 'आधीं प्रपंच करावा नेटका' हीच आम्हांस शिकवण आहे. पण ही शिकवण कांहीं तीनशे वर्षांपूर्वींच जन्म पावलेली नाहीं. ती फार प्राचीन आहे. गृहस्थाश्रमाचें कर्तव्य सोडून, बायकामुलांच्या आयुष्याचें वाटोळें करून, संन्यास घेऊन काशीस जाणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या वडिलांस गृहस्थाश्रमांत केवळ संसार कर्तव्याकरितांच त्यांच्या गुरूंनीं त्यांना परत पाठविलें. सर्वे सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥ आणि सहना ववतु । सहनौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥ ही शिकवण तर लौकिकजगाच्या उदयापूर्वींची आहे! सामाजिक जीवनाच्या जागृतीची जाणीव ही कांहीं आज नवीन नाहीं. संसार सोडा असें न म्हणतां उलटपक्षीं ब्रह्मचर्याश्रमांत ज्ञान संपादन करा (म्हणजे भोळसट अंधश्रद्धाळू न राहतां विचारशील व्हा), गृहस्थाश्रमांत आधीं नेटका प्रपंच करून नंतर संन्यास व वानप्रस्थाश्रमांत सर्व सूत्रें युवराजाच्या हातीं देऊन शहाणपणानें सर्वसंगपरित्याग करावा आणि लोककल्याण करून स्वतःच्या आत्म्याची उन्नति करून घ्यावी असेंच आमचें आध्यात्मिक आणि सामाजिक तत्त्वज्ञान सांगतें. ऐहिकार्थ

व परमार्थ यांचा हा समन्वय अद्वितीयच असला पाहिजे. संसारी कर्तव्य पार पाडलेल्यानेंच संसारांत उदासीन राहावयाचें आहे. आणि त्यांतच कुटुंबाबरोबर, समाजाबरोबर स्वतःचेंहि हित आहे. हें आजच्या अतिलोभी म्हाताऱ्यांच्या प्रत्ययावरून सहज स्पष्ट होण्यासारखें आहे. संसार सुखाचा व्हावा आणि दुःखाचा असला तरीहि तो करावा अशी आमची ऊर्मी आहे म्हणून तर विवाहसंस्था आहे, पतिपत्नींचीं एकमेकांकरितां व्रतवैकल्यें आहेत, स्वयंवर आहे, ब्रह्मचर्यातील गुरुकुलांत शिक्षण आहे, मुलें व्हावींत म्हणून यज्ञ आहेत, पाऊस पडावा म्हणून यज्ञ आहेत; एवढेंच काय, विवाहसुखांत कमतरता पडूं नये म्हणून आमच्या आचार्यांनीं कामशास्त्राचीहि त्यांच्या शक्त्यनुसार भरपूर चिकित्सा केली आहे ! वंशवृद्धीसाठीं तर क्वचित् प्रसंगीं परसंभोगापासूनहि पुत्रप्राप्ति करून घ्यावी पण निपुत्रिक मरूं नये असें आमचें धर्मतत्त्व सांगतें. निपुत्रिकाला नरकांत पडावें लागतें अशी धमकी आमचे पुराणिक देतात ती संसार करण्याची ऊर्मी आहे म्हणूनच ना ? आमचे ऋषी ब्रह्मज्ञान सांगत बसले तसें कामशास्त्रहि लिहीत बसले. व्रतोपवास करून देवपूजा करावयाला लावतात त्याप्रमाणें पत्नीची कशी निवड करावी तेंहि सांगितल्यावांचून राहात नाहींत. संसारांत उदासीन राहाण्यासाठीं हें सर्व खास केलेलें नाहीं. भौतिकवाद्यांच्यापेक्षां आमच्या सुखाच्या कल्पना निराळ्या हें मात्र खरें. विषयसुख हेंच विवाहाचें ध्येय असें भौतिकवाद्यांस वाटत असेल तर विषयसुख हें साधन असून त्यायोगें कुटुंब व समाज याविषयींचें कर्तव्य पार पाडून आत्मोन्नतीस चुकूं नये व असें करीत असतां त्या कर्तव्यतत्परतेंतच पतिपत्नींस अधिक सुख आहे अशी भारतीय तत्त्वज्ञांची कल्पना आहे. आणि याप्रमाणें विषयसुखाहून निराळें कांहीं तरी विवाहाचें ध्येय असावें असें आतां पाश्चात्त्यांना अनुभवानें पटूं लागलें आहे, हें त्यांच्या विस्कळीत कुटुंबसंस्थेवरून व त्यापासून उद्भवणाऱ्या सामाजिक प्रश्नां-

वरून सहज दिसून येतें. पतिपत्नींनीं मनसोक्त चैन करावी आणि त्यांतून निष्पन्न होणाऱ्या संततीची जबाबदारी मात्र समाजानें म्हणजे राष्ट्रानें घ्यावी ही अप्पलपोटी बेजबाबदार कल्पना मात्र आमच्यांत नाहीं हें खरें ! पण त्यामुळें संसारांत खरा उदासीन कोण तें मात्र स्पष्ट होतें. जमेल तितके दिवस बायकोशीं बायको म्हणून संबंध ठेवण्यांत, हॉटेलमध्यें राहण्यांत, संतति राष्ट्राच्या अंगावर टाकून देण्यात आणि मुलें मोठीं झालीं म्हणजे स्वातंत्र्यहक्काचा शिक्का ठोकून त्यांची आपल्यावरील जबाबदारी अंगाबाहेर झाडून टाकण्यांत संसारांतील उत्साह कोठें दिसतो तेंच कळत नाहीं. आणि कर्तव्य-पालनास्तव पत्नीशीं जन्मभर आपलेपणानें राहाणारा, लहान मुलांचें संगोपन स्वतःच्या जबाबदारीवर करणारा, मोठ्या मुलांचें शिक्षण करून देऊन वयांत आल्यानंतरहि आपल्या सर्व प्रजेचें एक मोठें कुटुंब करून त्या सर्वांची जबाबदारी मरेपर्यंत आपल्या अंगावर घेऊन, अशा तऱ्हेनें समाजाचा आतां राष्ट्राचा बराचसा भार हलका करणारा आमचा गृहस्थाश्रमी उदासीन कोठें दिसतो तेंहि समजत नाहीं. नाहीं तर उत्साही आणि उदासीन या शब्दांच्या व्याख्याच बदलाव्या लागतील.

## जग हें असार आहे :

वर म्हटल्याप्रमाणें मुख्यतः शंकराचार्यांच्या तात्त्विक सिद्धान्ताचें हें व्यावहारिक विडंबन आहे. पण हें जग असार आहे असें कुणीं म्हटलें आहे ! जर कोणीं म्हटलें असेल तर केव्हां, कुठें व कोणत्या अर्थानें ? कोणीं आचार्यांनें, समजा, तसें म्हटलें असेल तर त्यानें व्यवहारांत म्हटलें आहे काय ? तत्त्वज्ञानाची चिकित्सा कर-तांना तर्कशुद्ध बुद्धींतून जें काय निष्पन्न होईल तें होईल. आपल्या

स्वभावधर्मास मानवतें वा न मानवतें हें पाहून तडजोड तर नाहीं करावयाची ? जग हें असार आहे असें म्हटलें तरी त्याची पार्श्वभूमि निराळी आहे. तत्त्वज्ञानांतील तो एक चिकित्सक प्रश्न आहे. तत्त्वज्ञानांत विशिष्ट मर्यादेंत पोंचल्यावर जगाचें असारत्व पटूं लागतें. पण हें पटावयास त्यापूर्वीचें तर्कशास्त्र पाहावयास पाहिजे, व तिथपर्यंत पोंचावयास पाहिजे. निर्वस्तु जगाची (non-materialism) विचारप्रणाली पुढें मांडतांना बर्क्लेनें काय तडजोड केली होती ? बौद्धांच्या तत्त्वज्ञानात निर्वाणपदाला पोंचणारा मनुष्य हा निर्गुणावस्थेंत असतो. म्हणजे तो सद्गुण व दुर्गुण यांच्या पलीकडे गेलेला असतो. या वेळीं दुर्गुण हें जितकें पाप तितकेंच सद्गुण हें पाप आहे; कारण त्यानें कर्मेच्छा राहून निर्वाणपदासाठीं अवश्य असणारी विमुक्त, आलिप्त स्थिति मिळत नाहीं. आतां या ठिकाणीं सद्गुणसुद्धां दुर्गुणाच्या पंक्तीला बसविला आहे. म्हणजे याचा अर्थ असा काय, कीं गौतम बुद्धाला सद्गुणाची चाड नव्हती, व सद्गुण हा तितकाच वाईट दुर्गुण आहे ? आणि यावरूनच कोणी सद्गुण हा वाईट गुण आहे, तो सोडून द्या म्हणून प्रचार करूं लागला तर तें कितपत शहाणपणाचें होईल ? सद्गुण हें पाप ठरण्यासाठीं सद्गुणांस जिंकून त्यांच्यापलीकडे निर्वाणपदाची निकटावस्था प्राप्त व्हावयास पाहिजे व ती तशी स्थिति प्राप्त झाली तरच सद्गुण हें पाप ठरेल. हीं आत्म्याची अवस्था ज्याच्या गांवींहि नाहीं त्याला मात्र सद्गुणाव्यतिरिक्त तरुणोपाय नाहीं. जग हें असार आहे हें ब्रह्माच्या निकटावस्थित योग्याला आहे; इतरेजनांचा त्याशीं कांहीं संबंध नाहीं. इतरेजनांना तसा असारत्वाचा उपदेश केला आहे; पण तो जगांतील रस जिंकून, त्यांना भिऊन, त्याचा तिरस्कार करून नव्हे. पातंजलयोगसूत्रांचें थोडें जरी अवलोकन केलें तरी हें सहज समजण्यासारखें आहे कीं, त्या योगाचा अभ्यास संसारांत राहूनच करतां येतो शिवाय संसार-सुखें भोगूनहि योगाभ्यासी इतरेजनांहून

आपलें उच्चस्थान ठेवून आपल्या 'समाधि' या अवस्थेस यत्किंचित्‌हि बिघाड आणूं शकत नाहीं. किंबहुना संसारसुखाचें सर्वोत्तम साधन म्हणजे योगाभ्यास. कारण त्यानें मनाची व शरीराची अशी विलक्षण घाटणी बनून जाते कीं रतिसुखापासून तों थेट ब्रह्मसुखापर्यंत किंवा आत्मोन्नतीपर्यंत सर्व प्रकारचीं सुखें भोगण्याचें सामर्थ्य सामान्य मनुष्यापेक्षां अधिक येतें. पण त्या सर्व सुखांचें मूळ सूत्र संयम आहे. आणि यालाच जर भौतिकवादी उदासीनता म्हणत असतील तर त्याला उपाय नाहीं.

'जग हें जड असार आहे' हें वचन शंकराचार्यांचें आहे हें खरें. परंतु तत्कालीन परिस्थिति व त्या वचनाचा त्या वेळीं झालेला परिणाम हें पाहावयास पाहिजे. त्यांच्या या भाष्यामुळेंच आज हजारों वर्षांनंतर तुम्ही आम्ही हिंदु म्हणून जगत आहोंत. शंकराचार्यांच्या मतें जग सत्य आहे, तें इंद्रियज्ञानदृष्ट्याच आहे. परमार्थतः नाहीं. म्हणजे ब्रह्म या सर्वश्रेष्ठ सत्याच्या मानानें कमी कसाचें हें सत्य आहे. आजचें भौतिक शास्त्रहि इंद्रियज्ञानदृष्ट्याच जगाची सत्यता मानतें ना ? शंकराचार्यांप्रमाणें परमार्थतः सत्याची शास्त्रज्ञाला दृष्टि नाहीं. तत्कालीन पार्श्वभूमीला जो पवित्रा योग्य वाटला तो शंकराचार्यांनीं स्वीकारला व अपेक्षेप्रमाणें त्या पवित्र्याचें फळहि मिळवून दाखविलें. बृहदारण्यकोपनिषदामध्यें सुद्धां याज्ञवल्क्य मैत्रेयीला आत्मज्ञान सांगत आहे त्यामागील भूमिका लक्षांत घेण्यासारखी आहे. ऐहिक जगातील आपलें कर्तव्य पार पाडल्यानंतर आयुष्याच्या शेवटल्या अंकांत आपल्या उभय पत्न्यांना बोलावून घेऊन संसाराची निरवानिरव करून दोघींच्या पोटापाण्याची व्यवस्था करतो व शेवटीं स्वतः तपोवनांत जाण्यापूर्वीं आत्मज्ञानाचा संदेश देतो. ब्रह्म हें सत्य असून जग मिथ्या आहे हें ज्ञान त्याला अधिकारीपणानें प्रथमच आत्मगत होतें मग तो या असार जगांत असार संसार कशाला करता झाला असता ? आणि एक सोडून

दोन बायकाशीं ? परंतु ज्या जगात आपण जन्मास आलों व ब्रह्मज्ञान ज्या जगांत राहून हस्तगत करतों त्या जगाविषयींचीं आपलीं कर्तव्यें शिल्लक राहातात, ऋणें फेडायचीं राहतात, तीं प्रथम पार पाडून नंतर शेवटीं आत्मज्ञान हाच त्या सर्व संवादाचा सारांश ना ! संन्यास व वानप्रस्थाश्रम गृहस्थाश्रमानंतर सांगितला आहे ही महत्त्वाची गोष्ट डावलून चालणार नाहीं.

याप्रमाणें जग जड म्हणून त्याचा तिरस्कार आम्हीं कधींच केला नाहीं. ज्या संताच्या वचनांवरून हा भ्रम होत असेल त्या ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम इत्यादि बऱ्याच संतांनीं व शंकरादि आचार्यांनीं स्वसंसार असार मानून सर्व समाजाचा संसार त्यांनीं चालविला हें विस्मरून चालणार नाहीं. आणि ज्यांनीं जगाला जड म्हणून संबोधिलें ते तत्त्वज्ञ होते; समाजशास्त्रज्ञ म्हणजे स्मृतिकार नव्हते. समाजधारणेचा विचार करीत असतां जग जड आहे म्हणून सर्व समाजानें आपापले संसार सोडून द्यावेत असा शोध जोंपर्यंत हे समाजशास्त्री लावीत नाहींत तोंपर्यंत कोणींहि बिचकून जाण्याचें कारण नाहीं. तत्त्वज्ञान्यांस तत्त्वशोधनांत जें सांपडलें तें त्यांनीं स्पष्टपणें आपल्या शक्त्यनुसार सांगून टाकलें आहे. जसें भौतिक संशोधन तसें हें तात्त्विक संशोधन आहे. मग त्यांतून निष्पन्न जें होईल तें खरें. एखाद्या रासायनिक संशोधनांत कडू पदार्थ मिळाला तर तसा काढल्याबद्दल त्या संशोधकाला दोष कसा देतां येईल ?

## षड्रिपु हे रिपुच आहेत :

एकदा अध्यात्माविषयीं तिरस्कार उत्पन्न झाल्यावर व तसा प्रसार करण्याचें ठरविल्यावर त्या विषयातील प्रत्येक गोष्ट दुरर्थक कशी ठरेल याच्या शोधास लागणें आवश्यक होतें. जग हें जड आहे यासंबंधानें पूर्वीं जें सांगितलें तोच प्रकार येथें आहे. काम,

ग्रं. क्र. ५५८४१

क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्गुणांना रिपु म्हणून कोणी 'शिवी' दिली ? त्या षड्गुणांचें सद्गुणांत रूपांतर होण्यासाठीं संयम राखावा लागतो असें प्रा. माटे त्याच (पृ.७७) परिच्छेदांत म्हणतात. आणि त्यांचा अतिरेक विषाप्रमाणें आहे हेंहि ते बोलून दाखवितात. मग या विषारी गुणांना म्हणजे अतिरिक्त गुणांना रिपु म्हणून संबोधलें तर बिघडलें कोठें ? प्रा. माटे ज्या संयमित गुणांना आमचे मित्र म्हणून म्हणतात ते काय त्यांनीं नवीन शोधून काढले काय ? आमच्या धर्मांत त्या संयमित गुणाना स्वतंत्र नावें आहेत. कारण त्यांची मूलभूत कल्पनाच त्या षड्रिपूंहून भिन्न आहे. त्यांचाच पुरस्कार धर्मांत केला आहे. ' काम ' हा एक मनुष्याचा गुणधर्म आहे. तो जन्मजात आहे हें ओळखून त्याला लगाम घालून त्याचा समाजाकडे फार मोठा उपयोग करून घेतला आहे. आमची विवाहसंस्था ही त्या ' काम ' गुणाला मिळालेली मान्यताच आहे. एवढेंच नव्हे तर ' काम ' गुणाचा जास्तींत जास्त उपयोग प्रत्येक माणसास करून घेतां येईल हें माहीत करून घेण्यासाठीं ' काम 'शास्त्र तयार केलें. त्याचें अगदीं सौम्य स्वरूप जें प्रेम तें स्त्रीपासून कसें मिळवावें याचाहि विचार त्या शास्त्रांत केला आहे. पतिपत्नींचें परस्परांवरील प्रेम व निष्ठा हींच विवाहाची सर्वश्रेष्ठ कसोटी असें आमचे शास्त्रकार मानतात. आणि या निष्ठेमुळेंच पाश्चात्त्याप्रमाणें मनांत आलें कीं घटस्फोट मिळवून मोकळें व्हावें हे प्रकार आमच्याकडे रुचत नाहींत. क्रोध हा तर क्षत्रियाचा आत्मा आहे. त्याला आम्ही सौम्य व उदात्त रूपात स्वाभिमान म्हणतों. अन्यायाची चीड व प्रतिकारास लागणारी क्रुद्धता यांशिवाय क्षत्रियत्व फोल आहे. क्षत्रियाच्या स्वाभिमानी पराक्रमांत या 'क्रोधा'ला आम्हीं बसवून ठेवलें आहे. क्षत्रियच काय पण प्रत्येक माणसास वरील दोन गुण आवश्यक आहेत. आणि ते आमच्या धर्मांत नाहींत म्हणजे आमचा धर्म नेभळा आहे असाच अर्थ होतो. परंतु हिंदुधर्माचा प्राण प्रस्थानत्रयी यांतील

भगवद्गीतेंत उदात्त क्रोधाचीच शिकवण दिली आहे. लोभाचें रूपांतर महत्त्वाकांक्षेत आहे. मोह आणि मद हे सुद्धां मितप्रमाणांत उपयुक्त आहेत हें मान्य आहे. थोड्या प्रमाणांत मत्सर पतिपत्नींमध्यें उत्तम कार्य करूं शकतो हेंहि नाकारतां येणार नाहीं.

परंतु हें झालें कागदी घोडे नाचविणें. प्रत्यक्ष व्यवहारांत आपण काय पाहतों? हे षड्गुण असे पदार्थ आहेत काय, कीं आपण त्यांचा संयमित उपयोग करावा, म्हणजे त्या गुणांच्या गोळयांतील थोडासा तुकडा काढून आणावा? गुण असायचे तिथेंच असतात. आपलें मन मात्र प्रवाही असल्यानें तें गुणांकडे आकृष्ट होऊन लगट करावयास जातें. एखादी शेकोटी पेटलेली असावी आणि आपण थंडी वाजूं नये म्हणून शेकोटीपासून जरा दूर अंतरावर उभे राहतों व तेथें ऊब घेतों. ज्या अंतरावरून आपणांस ऊब येते तेथेंच उभें राहिलें तर शेकोटी ही 'मित्र' होईल. परंतु मनुष्याचें मन प्रवाही असून तें थोडक्यावर कधीं थांबत नाहीं. तें पुढें पुढें जावयास लागतें. अगदीं जवळ गेलें म्हणजे नष्टकाळाच्या समीप आपण जातों हें त्याच्या लक्षात येत नाहीं. जगामध्यें कोणता मनुष्य असा आहे कीं तो कोणतेंहि बंधन नसतां षड्गुणांचा संयमित उपयोग करून घेतो? उलटीं उदाहरणेंच बहुधा सर्वत्र सांपडतील. व जीं थोडीं सांपडणार नाहींत त्यांचें कारण त्या गुणांना विषारी मानून त्यांपासून जरा बेतानेंच तीं माणसें राहिलीं असतील. जगाचीं उदाहरणेंच अशीं आहेत कीं पैशाच्या लोभास बळी पडून अतिरिक्त कामासक्त होऊन, मोह न आवरून, फाजील गर्विष्ठ (मद) होऊन, क्रोधाच्या आहारीं जाऊन आणि मत्सराग्नीनें आपला व कुटुंबाचा सत्यनाश करून घेतला आहे.

मत्सरानें पतिपत्नींना एकत्र ठेवलें आहे अशीं उदाहरणें कोठें पाहिलीं आहेत काय? हें वाङ्मयांत ठीक आहे. एकत्र राहिलीं तीं प्रेमाच्या जोरावर. मत्सराचा यत्किंचित्‌हि प्रादुर्भाव होताच हळू हळू

शेकोटीच्या निकटत्वामुळें त्यानें त्या त्या माणसांच्या आनंदाचा व जीवनाचा नाश केला आहे. ऐहिक उत्कर्षाच्या मुळाशीं मोह असेल तर तो उत्कर्ष फार काळ टिकलेला नाहीं. उत्कर्ष उदात्त बुद्धींतूनच उगम पावला पाहिजे. गर्वाचें घर खालीं झालें नाहीं असें विरळाच. कर्तृत्वाचा जन्म लोभ असेल तर त्याची गति विशिष्ट मर्यादेंतच. आणि व्यवहारांत भिन्न भिन्न प्रेमांचें मूळरूप काम असेल तर तेथें अनाचारानें ठाण मानलेलें दिसतच आहे. तात्पर्य, रिपु ते रिपु आणि मित्र ते मित्र. दारू थोडी घेतली तर हितावह. बरीच घेतली तर नाशक आहे. पण दारू थोडी घेऊन कोणी कधीं राहिला आहे काय? औषधाकरितां घेतलेली दारू व्यसनाधीन होऊन बसली हेंच आपण सर्वत्र पाहत आहोंत ना? कारण दारू ती दारू.

म्हणून आमच्या तत्त्वज्ञान्यांनीं मानवी पुरुषार्थाची पाळेंमुळेंच बदलून टाकलीं. कर्तव्य, भूतदया, कर्तृत्व, प्रेम, पराक्रम आणि ईश्वरभक्ति अशा प्रकारच्या भूमिका घेऊन विवाह कामपूर्तीकरितां नसून वंशवृद्धीकरितां, लढाया क्रोधशमनाकरितां नसून 'साधूनां परित्राणाय', पतिपत्नींमधील दुवा मत्सरापेक्षां निष्ठा, गर्वाऐवजीं स्वाभिमान, लोभाऐवजीं लोककल्याण आणि कला मोहापेक्षा सौंदर्य हें ब्रह्माचें एक (सत्यं शिवं सुंदरं) रूप म्हणून अशा तऱ्हेची मनाची बैठक हिंदु तत्त्वज्ञानानें घालून दिली आहे.

## ३ : : : भौतिक प्रगतीचें परीक्षण

### भौतिक शास्त्रें आवश्यक आहेतच, पण :

प्रत्यक्ष व्यवहारांत भौतिक शास्त्रांचा अभ्यास न होतां भौतिक वादाचेंच अनुकरण होत आहे. भौतिक शास्त्रांची प्रगति झाली परंतु ती शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेत. बहुजनसमाज हा तसाच अंधानुकारी राहिला आहे. अनुकार्य प्रमाण बदललें एवढेंच. शास्त्रज्ञांनीं कष्टानें लावलेल्या रोपांचीं फळें आम्ही अंधपणें ऐदीपणांतच चाखीत आहोंत. म्हणजे, यांत एकानें कष्ट करावेत आणि बहुजनांनीं ऐदी राहावें असेंच होत आहे. आम्हांला व्यवहारांत शास्त्रीय दृष्टि आली नाहीं. नवीन आलेलें घेतांना व जुनें घेतलेलें टाकतांना आमचें जोरदार प्रवाही मन विवेकाच्या टेकाडांना डावलून वळसे घालून बाजूनें आपल्या इच्छित स्थळीं जात असतें. विवेकात्मा निघून गेला आहे अशीं भौतिकाचीं निष्प्राण अंगें स्वीकारून त्या प्रेतवत् अंगांशीं आम्ही शृंगार करीत असतों. आणि त्याच भौतिकाचा आम्ही उगा-चच झेंडा मिरवीत असतों.

बहुजनसमाज सोडून दिला तरी प्रत्यक्ष शास्त्रज्ञ आपलें कर्तव्य चोख बजावीत असतात काय ? प्रथमतः शास्त्रज्ञ हा स्वतःचा धनी फारच थोड्या वेळां असतो. बहुधा तो राजसत्तेचा किंवा बड्या धंदेवाईकाचा नोकर असतो. या वेळीं शास्त्रीयतेची शुद्धबुद्धि जाऊन, "आम्हांला आतां अमुक एक प्रकारची वस्तु पाहिजे आहे

ती शोधून काढा " असा हुकूम फर्मावला जातांच शास्त्रज्ञ त्या वस्तूचें विशिष्ट हेतूनें संशोधन करतो. यामध्ये संरक्षक व संहारक अशा दोन्ही प्रकारच्या वस्तूंचें सृजन होत असलें तथापि अशा अपेक्षित किंवा 'हुकमी' वस्तू शोधून काढणें हेंच त्या शास्त्रज्ञांचें ध्येय होतें. त्यामुळें मुळांत असलेलें ज्ञान हें ध्येय पदच्युत होतें. आणि ज्ञान पदच्युत झालें कीं संहारक व संरक्षक अशा दोन संशोधित वस्तू परस्परगुणरहित होतात. म्हणजे अग्नीप्रमाणें होतात. अग्नीचा उपयोग करावा तसा होतो. चांगला व वाईट. परंतु त्या वस्तूंत शक्ति आणावयाची असेल तर सुखसाधनांची वस्तुनिर्मिति हें ध्येय सोडून ज्ञान हें ध्येय ठेवावें लागेल, ज्याप्रमाणें स्त्रीचा उपयोग वंशवृद्धीकडे होतो आणि राक्षसी कामपूर्ति करण्याकडेहि होतो; परंतु आमच्या विवाहसंस्थेनें विशिष्ट स्त्रीपुरुषसंबंधास एकप्रकारचें पावित्र्य आणून संयमित कामपूर्तीनें वंशवृद्धि व्हावी अशी व्यवस्था करून ठेविली आहे. यामध्यें विवाहाचें ध्येय कामपूर्ति न मानतां समाजपोषण मानलें आहे. त्यामुळें कामपूर्ति हें साधन होऊन वंशवृद्धीच्या ध्येयानें त्यास न कळत मर्यादा घातली गेली आहे. शिवाय हिंदुधर्मांत स्त्रीविषयीं देवताभाव असल्यानें स्त्रीसंबंधानें कामापेक्षा पावित्र्याची भावना निर्माण होण्यास मदत होते. शास्त्रज्ञाचें ध्येय ज्ञान झालें तर वस्तु-निर्मिति सहजगत्या होत जाईल. पण ती मर्यादित आणि विशिष्ट तत्त्वाचा पुरस्कार करणारी, विशिष्ट हेतूनें प्रेरित झालेली. भौतिक शास्त्र हें अतिरिक्त कामातुर पुरुषाच्या हातात मोकळी सांपडलेली स्त्री आहे असेंच म्हटलें पाहिजे.

## भौतिक शास्त्रांची फसवी प्रगति :

अलिकडच्या काळांत भौतिक शास्त्रांचा पसारा विलक्षण वाढला आहे. या पसाऱ्यानेंच सर्वांचे डोळे दिपून गेले आहेत. ज्या गोष्टी

आपणांस व्यवहारांत नाविन्यपूर्ण, कुतूहलजनक, विविधतेच्या व आश्चर्यचकित करणाऱ्या वाटतात. त्यांत शास्त्रीयदृष्ट्या विशेष व नवीन असें कांहींच नसतें. जादुगार ज्याप्रमाणें थोडक्याशा हात-चलाखीवर नाना खेळ करून दाखवितो त्याप्रमाणेंच येथें आहे. किंवा चित्रपट पाहतांना ज्याप्रमाणें जाडी, खोली, लांबी, रुंदी सहित खूप मोठीं व बोलकीं चित्रें दिसतात व आपणांस तीं अगदीं हुबेहूब वाटून सत्यसृष्टि पाहिल्याचा संतोष होतो. त्याप्रमाणें शास्त्रीय शोधाचें आहे. मुळांत तीं चित्रें बोलकीं नसतात, जाड नसतात, खोल नसतात व मोठींहि नसतात. पडद्यावर सर्व दिसतें तें यांत्रिक युक्तीनें भासमय केलेलें असतें. मुळांत तें फारच थोडें असतें. म्हणजे शास्त्रीय शोधांचें आज आपण एवढें कौतुक करतों व डोळे दिपून जाण्या इतका फापटपसारा दिसतो व जणुं तो सर्व प्रगतीच्या मापनाचा मानदंडच आहे असें समजतों; पण तें खरें नसतें. आपली अशी कल्पना असते कीं सर्व शोध एक केले तर एक मोठा महासागर होईल. मग त्याची खोली म्हणजेच प्रगतीची उंची मोजण्यासाठीं त्या सागराच्या मध्यावर एक काठी रोवली आहे. तात्पर्य, शास्त्राच्या प्रगतीची मोजदाद घ्यावयाची झाली तर एवढा उपद्व्याप आहे ! पण आपणच आपली फसगत करून घेतों. आपण प्रगति मोजतों ती कशानें ? जीं यांत्रिक सुखसाधनें वाढलीं त्यानें. प्रत्येक वेळीं एकच उत्तर. ती मोटार, विमानें, रेडिओ, ॲटम बॉंब, आगगाडी, पेन्सी-लीन, एक ना दोन, हजारों उपकरणें अशीं शोधून काढलीं आहेत कीं त्यांनीं आम्ही पूर्वीच्या पीढीच्या किती तरी पुढें गेलों आहोंत ! नव्हे, जो पूर्वी स्वर्ग स्वर्ग म्हणून म्हणत असत तोच कालान्तरानें पृथ्वीच्या रूपांत आज अवतारला आहे ! पण हीं सुखसाधनें म्हणजे शास्त्राची प्रगति नव्हे. कारण हीं साधनें मनुष्याला आपल्या वैभवाचा आत्मा वाटत असलीं तरी तीं शास्त्रांचा आत्मा नाहीं हें

निर्विवाद आहे. हे सर्व शोध आपण व्यवहाराच्या जाड भिंगामधून पाहत असल्यानें त्याचें सर्वव्यापी असें भव्य रूप दिसतें. परंतु हें व्यवहाराचें जाड भिंग बाजूस केल्यावर व शुद्ध शास्त्रीय दृष्टि पुढें ठेवल्यावर सूक्ष्मदर्शक यंत्राखालील अभिबाची जी स्थिति होते ती या शोधाची होईल. कारण या सर्व शोधामागें शास्त्रांचीं तत्त्वें फारच थोडीं आहेत. शास्त्रांच्या प्रगतीचें माप हीं तत्त्वें आहेत, ते शोध नव्हेत. ज्याप्रमाणें एकाच मळलेल्या मातीचीं अनेक चित्रें तयार करता येतात, पण मुळाशीं एक मातीच आहे, तद्वत् पुष्कळ शोधाच्या मुळाशीं एक तत्त्व आहे. व हीं तत्त्वें शास्त्रांचा आत्मा आहेत. त्या तत्त्वाच्या प्रगतीवरून शास्त्राची प्रगति गणली जाईल.

आतां हीं तत्त्वें काय स्वरूपाचीं आहेत, तीं कितपत सत्य व अबाधित आहेत, हा सत्यतेचा व अबाधितत्वाचा प्रश्न नंतर पाहूं. जरा दुसरा प्रश्न हाताळूं. या शास्त्राचा मार्ग काय आहे ! तत्त्व-शोधन हें ठरलें. ज्याप्रमाणें गणितात रीतीला महत्त्व आहे त्याप्रमाणें येथें मार्गाला महत्त्व आहे. गणिताचा अभ्यास करणाऱ्या विद्या-र्थ्यांत दोन प्रकार असतात. कांहीं जण गणिताची रीत म्हणजे त्याचा गाभा प्रथम समजावून घेतात. तो सांचा तयार झाल्यावर मग ते त्या पद्धतीवरील कोणतेंहि उदाहरण सोडवूं शकतात व अशा सर्व रीती तयार असल्या म्हणजे अमुक एक उदाहरण अमुक रीतीचें आहे, तें उदाहरण वाचून जाणू शकतात. पण एवढें साध्य करण्यासाठीं त्यास फारच थोडीं उदाहरणें म्हणजे केवळ त्याचे एक एक प्रकारच त्याचा गाभा समजावून घेऊन सोडविलीं तरी चाल-तात. पण दुसऱ्या विद्यार्थ्यांचा जो प्रकार आहे तो कांहीं विलक्षणच आहे. ते गणिताची रीत पाहत नाहींत. त्याचा गाभा काय तो सम-जावून घेण्याच्या भानगडींत पडत नाहींत. जें उदाहरण पुढें असेल तें तोंडपाठ करून टाकावयाचें. त्याच्यासारखें दुसरें आलें तरी तेंहि आधीं पाठ केल्याशिवाय सुटायचें नाहीं. अशा तऱ्हेनें पुस्तकांत

जीं काय चार-पांचशें उदाहरणें असतील तीं सर्व पाठ करून टाकण्याची त्यांची ईर्षा असते. कारण परीक्षेंत या पुस्तकाच्या बाहेरील उदाहरण कोठलें येणार ? त्याचप्रमाणें संस्कृतचें. पहिल्या प्रकारचे विद्यार्थी जो श्लोक घेतील त्यांतील प्रत्येक शब्दाचें व्याकरण पाहून त्याचें रूप कसें होतें, मूळ अर्थ काय, येथें काय घ्यावयाचा असें खोलांत शिरून याप्रकारें पांचपंचवीस श्लोक करतात. व अशी संवय लागली म्हणजे कितीहि नवा श्लोक आला तरी तो समजावून घेण्यास अडचण पडत नाहीं. पण दुसरे असतात ते एका बाजूस संस्कृत श्लोक, दुसऱ्या बाजूस त्याचें भाषांतर, असें पुढें ठेवून दोन्हीची घोकमपट्टी करतात. जितके श्लोक तितक्यांच्या भाषांतराचें अनुक्रमानें पाठांतर. पाठ न केलेला श्लोक आला तर त्याची गाळण उडते. यांतलाच कांहींसा प्रकार भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाच्या मार्गांत आहे. अध्यात्माचा मार्ग पहिल्या प्रकारच्या विद्यार्थ्यांचा तर भौतिक शास्त्रांचा दुसऱ्या प्रकारच्या विद्यार्थ्यांचा. त्यामुळें कितीहि वस्तूंचा कसून अभ्यास केला तरी तो त्या वस्तूंपुरताच. व विश्वांतील बाकीच्या वस्तू शिल्लक राहणारच. त्यामुळें शास्त्र हें कधीं पुरें होणारें नाहीं. कारण विश्वांतील या पद्धतीनें अभ्यास करावयाचा म्हटल्यास किती तरी वस्तू आणि प्राणी व त्याचें गूढ शिल्लक राहाणारच. शास्त्रज्ञ जसजसा अभ्यास करूं लागतात तसतसें त्यांस अपरंपार ज्ञान होत जाईल. व तसें आतां झालेंहि आहे. पण त्याबरोबरच जें माहित झालें नाहीं असें ज्ञान त्याहूनहि अपरंपार आहे. व जसजसे हे पुढें जात आहेत तसतसें माहित झालेल्या ज्ञानानें समाधान, उत्साह वाढण्याऐवजीं अज्ञानहि बरेंच राहिलें आहे हें कळून येऊन अधिकच बुचकळ्यात पडत चालले आहेत. प्रा. सर जेम्स जीन्स यांच्या Mysterious Universe या ग्रंथावरून दुसरें काय दिसून येतें ? बरें, आतापर्यंतचा शास्त्राचा आढावा घेतला तरीहि हा संशय अधिकच दृढ होतो. व ज्याप्रमाणें एखाद्या आड-

रानांत कांहीं लोक रस्ता चुकावेत आणि प्रत्येकजण आपल्या कल्पनेप्रमाणें विचार करून इतरास आपल्याबरोबर नेतो, बराच वेळ असें जाऊनहि रस्ता सांपडत नाहीं हें समजल्यावर दुसरा आपली शक्कल काढतो. याप्रमाणें सर्वांचे श्रम वायां जातात, व या त्रुटित प्रगतीचे अनेक खंड होऊनहि अन्तिम प्रगति कांहीं नाहीं. म्हणजे एक प्रगतिखंड दुसऱ्या प्रगतिखंडाला पोषक होत नाहीं, ही स्थिति शास्त्रज्ञांची होते. न्यूटननें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला व आज इतकीं शतकें लोक त्याला धरून होते. पण आतां ऐन्स्टाईननें लोकांस म्हटलें "हां, हां, तिकडे जाऊं नका. या इकडून या." व लोक गुरुत्वाकर्षणाकडून सापेक्षतेकडे आकर्षिले गेले. पृथ्वी चौकोनी ही मूळ धर्मकल्पना पण गॅलिलीयो आणि कोपर्निकस इत्यादिकांना ती गोल दिसली व हा सिद्धान्त बोलून दाखविल्याबद्दल किती शास्त्रज्ञांना जिवापाड हाल सोसावे लागले. व आपणांस आज त्यांची आटवण झाली म्हणजे म्हणतों, काय वेडे धर्ममोळे लोक. पृथ्वी गोल आहे हें शास्त्रानें अनेक दाखले देऊनहि सिद्ध केलें तरी यांचें आपलें 'बाबावाक्यं प्रमाणम्.' पण पृथ्वी गोल नसून चौकोनी आहे हा आजचा नवा सिद्धान्त आहे. Length, mass, time एवढींच तीन मापें नसून आणखी चवथेंहि आहे हेंहि आतां शास्त्रज्ञ सांगावयास लागले आहेत. डार्विननें जेव्हां प्रथम आपली विचारप्रणाली मांडली तेव्हां विश्वाचें जवळ जवळ निम्में गूढ उकलल्याचा सर्वांना हर्ष झाला व विश्वांतील केवढी संगति लावून दिली म्हणून डार्विनचें कौतुक झालें. परंतु त्याचाहि यापुढें आतां टिकाव लागणार आहे काय? प्राण्यांचा अनुक्रम लावताना तो अनुक्रम कोणत्या मूलतत्त्वावर लावला? अनुक्रम आहे म्हणजे प्रगति आहे. प्रगति आहे म्हणजे प्रथमावस्था व पूर्णावस्था या अवस्था ओघानें आल्या. पण या अवस्था कुठें व कशा मानावयाच्या? मनुष्य हा पूर्णावस्थेस पोंचत चालला म्हणजे काय? प्रगत म्हणजे मागच्याच्या

पुढें. पण पुढें म्हणजे कोठें ? मनुष्य हा पुढें आहे हें कशावरून ठरविलें ? त्याच्यामध्यें कितीतरी गोष्टी अशा आहेत कीं त्या प्रथमावस्थेस शोभण्यासारख्या आहेत; व खालच्या प्राण्यांचे गुणधर्म 'पुढें असलेल्या' माणसाला शोभतील असे आहेत. बरें, ती पूर्णावस्था म्हणजे कोणती ? कशा प्रकारची असूं शकेल याला कांहीं निश्चित कल्पना असूं शकेल काय ? दोन वस्तूंतील भेद हा निर्विवाद प्रगतिशील असतोच असें नाहीं.

## 'विद्याहरणां'तील शुक्राचार्य :

पृ. १२१ वर प्रा. माट्यांनीं आपलें शास्त्रीय स्वप्न दिलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं शास्त्राची प्रगति अजून पूर्ण झाली नाहीं. ती तशी झाली म्हणजे यंत्रामुळें आज जीं नुकसानें दिसत आहेत तीं नाहींशीं होऊन जगांतील अवघा मानव सुखी होईल. प्रत्येक मनुष्य जीवनास लागणाऱ्या सर्व यंत्रांचा धनी झाला आणि आज ज्या सोयी करावयाच्या राहिल्या आहेत त्या नवीन शोधांनीं झाल्या म्हणजे पृथ्वीचें नंदनवनच होईल. आम्हांला सुद्धां सर्वांना अशी रुखरुख आहे कीं मनुष्याला अजून अमर राहण्याची युक्ति साधली नाहीं. दुसऱ्याच्या मनांतील विचार जाणतां येत नाहींत. इच्छित वस्तु पाहिजे तेव्हां प्राप्त होत नाहीं. हजार मैल लांब असलेल्या स्त्रीचा मी दर्शनानें व श्रवणानें लाभ घेऊं शकतों. स्पर्शेंद्रियें अजून तहानलेलींच आहेत. त्यांचीहि तृप्ति व्हावी. शाप आणि वर देण्याचें सामर्थ्य अजून प्राप्त झालें नाहीं व संकटकाळांत अदृश्य होऊन जीव बचावतां येत नाहीं. पण उमेद आणि महत्त्वाकांक्षा ह्या अशा आहेत कीं शास्त्रांना हाताशीं धरून मी या सिद्धी मिळवीनच आणि या 'जड मर्त्य लोकाचें' स्वर्गांत रूपान्तर करीन. कविकल्पना म्हणून नाहीं पण कर्तृत्वाची उमेद म्हणून या कल्पवृक्षा-

खालीं बसणें कांहीं वाईट नाहीं. पण त्यानें आम्ही सुखी होऊं किंवा उन्नत होऊं ही मात्र वेडी आशा आहे. Francostine आणि The Invisible Man हे शास्त्रज्ञांचे भविष्यत् काळांत अवतार घेणारे स्वप्नसृष्टीचें स्वरूप दाखविणारे चित्रपट या दृष्टीनें उद्बोधक आहेत. आणि याहि पुढें जाऊन शुक्राचार्यांची जी अवस्था झाली तीच या भौतिक शास्त्रज्ञांची अवस्था होईल. आज जें आपणांस अवगत नाहीं व म्हणून ज्याकरितां आपण तळमळतों ती विद्या शुक्राचार्यांजवळ असून सुख किंवा उन्नति त्यांस प्राप्त झाली काय ? किंबहुना, संजीवनीमुळेंच त्यांचा शेवटीं नाश झाला. विद्या होती पण ती धारण करण्याची पात्रता नव्हती. सुख आणि उन्नति भौतिक साधनांत नाहीं. तेव्हां ती कमी पडली म्हणून मनुष्यास मागें पाऊल घेण्याचें कांहींच कारण नाहीं. सुख आणि उन्नति मानसिक पात्रतेवर अवलंबून नसल्यामुळें ती सिद्ध न होतां केवळ जीवनसाधनें समृद्ध झालीं तर तीं माकडाच्या हातांतील कोलीत बनतात. पण हें आज आपण स्पष्ट पाहात आहोंत. ॲटम बॉंबमुळें निरपराधी जनांची कत्तल करूं लागतों पण आपापसांतहि विश्वास नसल्यानें एकमेकांस चकविण्याचे प्रयत्न चालले आहेत. ज्या ज्या ठिकाणीं भौतिक साधनें समृद्ध झालीं आहेत त्या त्या ठिकाणीं खून, दरवडे, स्त्रियांवरील अत्याचार इ० गुन्ह्यांचें प्रमाण झपाट्यानें वाढत आहे. अमेरिका, फ्रान्स, रशिया इत्यादि देशांत याचें प्रत्यंतर चांगलें पाहावयास मिळत आहे. तेथील जीवन सुखी होण्याऐवजीं जीवनावरील धोका वाढत चालला आहे.

### दृष्टिकोण बदलला पाहिजे :

आणि याचें कारण काय ? यंत्रें व इतर शोध. म्हणजे पर्यायानें भौतिक शास्त्रें. याचा अर्थ असा कीं यंत्रें दुष्ट आहेत. अर्थात् शास्त्रेंच

दुष्ट आहेत. पण प्रा. माटयांनीं याला उत्तर दिलें आहे. 'शास्त्रें कांहींच करीत नाहींत. मनुष्यच दोषी आहे.' पण शास्त्रें तरी मनुष्यच निर्माण करतो ना? मग शास्त्रांतील अभ्यासच बंद करावयाचा? आणि तो बंद कसा होणार? ही विचारप्रणालीच सदोष आहे. शास्त्रांचा अभ्यास आणि भौतिक साधनें या दोहोंची जी आपण मगरमिठी घालून देतों ती प्रथम सोडविली पाहिजे. शास्त्रांच्या तत्त्वाचा अभ्यास व्हावा पण शोधांच्या खेळण्याशीं भातुकली खेळत बसूं नये. म्हणजे ज्ञान हें ध्येय असावें. भौतिक शास्त्रांचा मोह होऊं नये. म्हणजे संशोधन चालू असतां त्यांतील बराचसा भाग राखून ठेवावा. ज्यामुळें भौतिक साधनें समृद्ध होतील व त्यांचा कांहीं बरा वाईट परिणाम होईल असे शोध सर्वांस प्रसिद्ध करूं नयेत. अशा तऱ्हेनें मानवसमाजावर होणारे शास्त्रीय शोधांचे दुष्परिणाम टळून जातील. प्रा. माटयांचें स्वप्न हें स्वर्गाचें स्वप्न नसून मायावी त्रिपुरनगरीचें स्वप्न आहे. तें आत्मघातकी, मायावी, भस्मासुरी स्वप्न आहे. परतु साधनसमृद्धि ही केवळ मोहिनी आहे. साक्षात् विष्णुच मोहिनी नर्तकीचें रूप घेऊन आला आहे हें आजच्या ताज्या इतिहासावरून स्पष्ट दिसत आहे. ही नर्तकी स्वतः नाचेल, तुम्हांस बरोबर घेईल, बेफाम झालांत म्हणजे तुमचा हात तुमच्या डोक्यावर ठेवून केव्हां भस्मसात् करील तें कळणारहि नाहीं. बिकीनी, हिरोशिटो, याकोहामा यांपासून डोक्यावर हात ठेवण्यास सुरवात झाली आहे. सुरवात आहे म्हणण्याचें कारण या दोन तीन प्रदेशांच्या भस्मांत भावी शत्रुसूडाचें व परस्परसूडाचें बीज अजून जीवन्त रूपांत राहिलें आहे. त्या प्रदेशांच्या भस्मांत त्या बीजाग्नीचा जन्म झाला आहे. इंग्लंड-अमेरिका या दोस्तां-दोस्तांत, दोस्त-रशिया या शत्रूंत आणि जर्मनी आणि जपान हीं भस्मीभूत राष्ट्रें उद्यांच्या जगड्व्याळ अग्निप्रलयाचीं आज जन्मस्थळें आहेत. यांत त्यांची प्रगति

नाहींच पण ही आत्मनाशाची काळरात्र आहे. आम्ही शोध लावतों. त्यांत चांगले व वाईट दोनहि असून ते निर्हेतुकतेनें शोधलेले आहेत. त्यांचा उपयोग करून घेणें आपल्या हातांत आहे. अण्वस्त्र घातकी असलें तरी त्याचाहि सदुपयोग करतां येण्यासारखा असून तसे आमचे प्रयत्न सुरू आहेत. हें म्हणणें निष्फळ आहे. ही पळवाट आहे. दुधाचे आणि दारूचे प्याले दोन्ही जवळ आणून ठेवले असतां लोक कोणते उचलतात तें माहीत असून दुधाबरोबर दारूचा प्याला कशासाठीं? यांत प्रामाणिकपणा आहे असें कोण म्हणेल? शिवाय उपायी शोध अपायी शोधांबरोबर आले असतां हजार उपायी शोधांनीं जगाचें जितकें कल्याण होईल तितकें सर्व कल्याण एखाद्या मर्कटाच्या जरी अंगांत आलें तरी तें एकाच अपायी शोधानें जगड्व्याळ अग्न्यस्त्राचा भडका उडवून देईल आणि आजपर्यंत केलेलें कोटकल्याण एका क्षणांत होतें कीं नव्हतें करून टाकील!

## भौतिक तत्परतेंत प्रगति?

अनुक्रम ९७४ विभाग

विज्ञानबोधाच्या प्रस्तावनेंत, आम्ही पार्थिवपराङ्मुख होऊन ऐहिक दृष्ट्या उदास झालों व पाश्चात्त्य आमच्या मागून येऊन या जगांत आमच्यापुढें गेले आहेत; म्हणजे पाश्चात्त्यांची प्रगति होत आहे असेंच म्हणणें आहे. समाजाची प्रगति ही दहा-पांच वर्षांच्या अवधींत आणि चार-दोन सुखसाधनांनीं मोजतां येत असेल असें वाटत नाहीं. शास्त्रीय अभ्यासानें समाजानें जीं नवीं तत्त्वें व नवीं साधनें शोधलीं तीं चिरकालीन दृष्ट्या अपाय उपाय वजा जातां समाजाच्या जमेच्या बाजूस कितपत शिल्लक राहतात, यांतच प्रगतीचें प्रमाण मानलें पाहिजे. प्रत्येक नवीन साधन आपल्याबरोबर अपाय उपाय दोन्ही घेऊन येत असतें. त्यांपैकीं कांहीं तत्काल

दृष्टोत्पत्तीस येतात तर कांहीं कालांतरानें अनुभवास येतात. सर्रास स्त्री-पुरुषसंबंधाचें तत्त्वज्ञान १९३९ च्या महायुद्धानंतर रशियास पंचवीस वर्षांच्या प्रयोगांतीं बदलावें लागत आहे. पण तत्पूर्वी तेंच प्रमाणभूत मानण्यांत येत होतें. अण्वस्त्राचा परिणाम तत्काळ प्राणहानींत व भयंकर आगींत होतो हें प्रथम कळलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्याच्या स्फोटाच्या आवाजानें मनुष्य बहिरा होतो, वायूनें विषबाधा होते असें ध्यानांत आलें. पुढील कांहीं दिवसांत जमिनी-वर परिणाम होतो याचें निरीक्षण झालें व त्याच्याहिपुढें पुढील एक दोन पिढ्यांवर परिणाम होतो असें अनुमान आहे. व त्याचें प्रत्यंतर दिसण्यास निदान पन्नास वर्षांचा काल पाहिजे.

शास्त्रीय प्रगतीचा परिणाम सामाजिक प्रगतीवरहि कितपत व कोणत्या प्रकारानें होतो तें पाहण्यासारखें आहे. शास्त्रीय प्रगतीनें बहुजनसमाज भौतिकप्रवण झाला आहे. म्हणजे ऐहिक सुखोपभोगापलीकडे कांहीं नैतिक ध्येय असतें किंवा व्यवहारांत शास्त्रीय दृष्टि आणि ज्ञानाला कांहीं स्वतंत्र स्थान असतें ही कल्पनाच नष्टप्राय झाली आहे. व्यापारवृद्धि होऊन अलोट संपत्ति असली तरी आर्थिक विषमतेच्या पोटीं जन्म पावणारे गुन्हे आणि वाद यांना यत्किंचित्‌हि खळ पडली नाहीं; उलट ते वाढतच आहेत. कारण व्यापारवृद्धीनें दारिद्र्यनाश झाला नाहीं. यांत नैतिक आणि आर्थिक दोन्ही प्रकारचे अधःपात स्पष्ट होत आहेत. भौतिक युगांत स्त्रीस्वातंत्र्याच्या व समान हक्कांच्या तत्त्वज्ञानाचा जोरदार प्रसार झाला; परंतु त्यामुळें होणारे दुष्परिणाम— बेकारी, स्त्रियांच्या निकृष्ट प्रकृती, कुटुंबसंस्थेंत उद्भव-णारी अस्थिरता, संततीच्या जोपासनेचा प्रश्न, इत्यादि प्रश्न कसे निस्तरावेत याची त्यांना विवंचना आहे. नैतिक दृष्ट्या तरुण पिढी अत्यंत मागासलेली आहे हें तेथील विचारवंत उच्च स्वरानें ओरडून सांगत आहेत. 'The Revolt of Modern Youth' या ग्रंथांत

कोलोरॅडो या शहरांतील विद्यार्थ्यांविषयीं लिंडसे म्हणतात, "One girl in every ten between the ages of fourteen to seventeen is guilty of sex deliquency, and between the ages of seventeen and twenty-one the percentage is much higher. ..." "Of all the youths who go to parties, attend dances, and ride together in automobiles more than 90 per cent. indulge in hugging and kissing, and at least 50 per cent. who begin with hugging and kissing do not restrict themselves to that." हें एका शहरासंबंधीं झालें. परंतु लिंडसे पुढें म्हणतात कीं याहिपेक्षां जास्त अनीति अमेरिकेंतील सर्व शहरांतून थैमान घालीत आहे. सर्व तऱ्हेचें वैद्यकीय अद्ययावत् साहाय्य, शास्त्रीय ज्ञान, सुशिक्षितता, साक्षरता, सुबत्ता या सर्व गोष्टी विपुल आणि प्रसृत असूनहि आणि हिंदुस्थानांत या सर्व गोष्टींचा पूर्ण अभाव असतांहि हिंदुस्थानापेक्षां युरोप-अमेरिकेंत गुप्त रोगांचें प्रमाण फार झपाट्यानें वाढत आहे. खून, दरवडे, चोऱ्या इत्यादिकांचें प्रमाण कमी न होतां उलट तें भौतिक शास्त्रांच्या प्रगतीच्या आधारें नवीन नवीन शास्त्रोक्त साधनांनीं वाढतच आहे. अमेरिकेंत शोध लागलेले खून असंख्य असतातच; पण केवळ मयताचा पत्ता लागत नाहीं असे खून वर्षाला एक हजार म्हणजे आठवड्याला पस्तीस होत असतात. (True Detective, Aug. 1947) आम्ही पारमार्थिक म्हणून ऐहिक संसारांत उदासीन आहोंत, मान्य. पण पाश्चात्त्य एवढे उत्साही आहेत त्यांचा नवराबायकोचा संसार तरी निश्चितपणाचा आहे काय ? त्या एकमेकांस आजच्याप्रमाणें उद्यांहि आपण नवराबायको म्हणूनच राहूं असा बालंबाल विश्वास आहे काय ?

## निर्वाळ्याची घाई नको :

गेल्या तीनचारशें वर्षांत भौतिक शास्त्रांची प्रगति अपरंपार झाली यांत शंकाच नाहीं. परंतु त्यावरून त्यांतील शास्त्रीय प्रमेयें किंवा शोध समाजाच्या व्यवहारास लावूं पाहणें हें आततायीपणाचें होणार आहे. जी कांहीं थोडी फार प्रगति झाली त्यावरून कांहीं अनुकूल व प्रतिकूल दृश्य परिणाम दिसतील यांत नवल नाहीं. परंतु ते ठाम समजून त्यावर मानवी जीवनाचीं प्रमेयें कायमचीं सोडवूं पाहणें किंवा त्या अभ्यासांतून सहज हाताला लागलेल्या चार दोन शोधांच्या सुखदायक उपयोगानें त्याचा एकदम व्यवहारांत सर्रास उपयोग करून आमच्या मानवी प्रगतीची ती फूटपट्टी म्हणून मानावी हें जरा पोरकट वाटतें. त्या चारदोन शोधानीं आपली फारच सोय होत असेल हें खरें पण त्याचे दुरगामी परिणाम जे असतील ते आजच कसे कळणार ? शास्त्रज्ञांनाच अद्यापि शास्त्र म्हणजे काय याचा अजून ठावठिकाणा लागत नाहीं. म्हणजे करतलामलकवत् तें शास्त्र निरीक्षितां येत नाहीं. त्यामुळें त्याचें सर्व बाजूंनीं होणारे परिणाम किंवा गुणधर्म आज जाणतां येत नाहींत. त्याला बराच कालावधि जाणें इष्ट आहे. आपण फारच घाई करतों. शास्त्रज्ञ आपले वाटाडे आहेत. त्यांना आधीं पुढें जाऊं द्या. सगळी वाट नीट पाहूं द्या. पोंचावयाच्या ठिकाणीं जाऊन एकंदर रस्ता कसा आहे ? किती आहे ? इत्यादि माहिती प्रथम त्यांना होऊं द्या. तें ठिकाण तरी कसें आहे हें तेथपर्यंत पोंचल्याशिवाय त्यांना तरी कसें सांगतां येणार ! आपण जरा मागेंच थांबूं. त्यांच्याबरोबरीनें चालून पायांत पाय घोटाळून त्यांना अडथळा आणूं नका. पण आपण काय करतों कीं त्यांच्याबरोबरीनें पाऊलावर पाऊल टाकावयास जातों. वाट त्यांनाहि नवीन व आपल्यालाहि नवीन. वाटेंत एखादी बारीकशी धर्मशाळा लागली, फळझाड लागलें किंवा

पाण्याचा तलाव लागला कीं आपण लगेच उड्या मारून आपल्याला जायचें तें हेंच ठिकाण असें उगाच समजून आपली पथारी तेथें पसरतों. एवढेंच काय पण अटकेपार झेंडा लावण्यासहि आपण कमी करीत नाहीं. असा उतावळेपणा करूं नये. शास्त्रज्ञाला शांत-पणें पुढें जाऊं द्या. तें ठिकाण आलें म्हणजे आपणाला तो आधीं सांगेल. मग आपण वाटेंत क्षणभर भेटणाऱ्या या झाडातळ्यांना भुलणार नाहीं. त्यांना आपण सोडूनच पुढें जाऊं.

# शास्त्रांची अशास्त्रीयता

## शास्त्रें मूलतः तात्त्विकच :

शास्त्रांस शास्त्र म्हणून जर जगावयाचें असेल तर लोकांनीं हा पोरखेळ सोडून द्यावा हें चांगलें. योगाभ्यासाविषयीं असें आहे कीं एक वेळ जगाचा सामान्य मोह सोडून योगाभ्यास करणें सुलभ आहे. परंतु अभ्यास बराच झाल्यानंतर अनायसा ज्या कांहीं अलौकिक सिद्धी प्राप्त होतात त्याचा मोह कांहींना त्यजवत नाहीं. शरीर अगदीं लहान व अगदीं मोठें करणें, अदृश्य होणें, दूरचें पाहणें–ऐकणें, मोह पाडणें इत्यादि अनेक. या सिद्धींना भुलून कांहीं योगी चमत्कार दाखवून जगांत विशेष प्रतिष्ठा मिळवितात. एवढेंच काय, पण वशीकरणाचीहि विद्या साध्य असल्यानें कांहीं लोक स्त्रियांसहि वश करून घेण्यास कमी करीत नाहींत. परंतु अशानें त्यांचें मूळ ध्येय दूरच राहतें; एवढेंच नव्हे तर, दुरुपयोगानें या सिद्धीहि हळू हळू नष्ट होत जातात व शेवटीं अशा अर्धवट योग्यांचें केडगांवच्या नारायणमहाराजांत किंवा उपासनीबाबांत रूपान्तर होतें. आपल्या ब्रह्मसाध्यापासून न चळणारे या सिद्धींना भुलून जात नाहींत. त्यांचा ते यथेष्ट उपयोग कधींहि करीत नाहींत. या अर्धवट योग्यांच्या स्थितीप्रमाणें आज भौतिक शास्त्रज्ञांची स्थिति झाली आहे.

कारण या वाटेंत लागलेल्या मोहांना बळी पडून अंतिम साध्यांचा विसर पडत जातो. जीवनसाधनांतच आणखी सुधारणा करून

जीवनांत सुख कसें वाढवितां येईल इकडेच सारें लक्ष. जे खरे शास्त्रज्ञ आहेत ते वस्तुतत्त्वच शोधीत असतात आणि निसर्गाची घटना समजावून घेणें हाच ते शास्त्रांचा प्रमुख उद्देश समजतात. परंतु अज्ञ जन भौतिकशास्त्रें याचा विपरीत अर्थ समजतात. 'भौतिक शास्त्रें' म्हणजे भौतिकांत रममाण होणारीं शास्त्रें असा नसून तीं भौतिक वस्तूंचा शोध करणारीं शास्त्रें आहेत. भौतिक हा त्यांचा मार्ग आहे, भौतिक हें साधन आहे; परंतु ध्येय भौतिक वस्तूचें तत्त्वशोधन हेंच आहे. भौतिक शास्त्रें भौतिकाचा अभ्यास करतात. पण त्या अभ्यासाचें निष्पन्न काय ? तर भौतिकाच्या मागें काय तत्त्व आहे ? काय शक्ति आहे ? मूलतः अध्यात्म आणि भौतिक यांत भेद नाहीं. दोहोंचें साध्य मूलतत्त्वाचें शोधन. केवळ मार्ग भिन्न. एक प्रथम मूलतत्त्वाचा विचार करून तेथून भौतिकांतील गूढ उकलण्याचा प्रयत्न करतो. तर दुसरा प्रथम भौतिकाला हात घालून त्याच्या सूक्ष्म रूपातून मूलतत्वाकडे जाण्याचा प्रयत्न करतो.

## भौतिक शास्त्रांचें वाढतें वर्चस्व :

भौतिकशास्त्रांचा पगडा जनमतावर, नव्हे बुद्धिमतांच्या मतावरहि, दिवसानुदिवस वाढता आहे. भौतिकशास्त्राचा अभ्यास सर्वत्र पुरस्कारला जात आहे. भौतिक शास्त्राना ही योग्यता प्राप्त होण्यास त्यांनीं लावलेले जीवनसाधनें वाढविणारे शोध आणि विचारक्षमता. भौतिक शास्त्रांचें समर्थन करतांना किंवा आजच्या भौतिकशास्त्रप्रधान जगाच्या आपण मागें नाहीं अशी आपली बाजू मांडतांना आपण नेहमीं आमच्या जुन्या इतिहासाचा दाखला देतों. आमच्यांतहि वात्स्यायन, कणाद, कपिल, भास्कराचार्य, चरक इत्यादि ऋषी होऊन गेले व त्यांनीं भौतिक शास्त्रांचा अभ्यास आजमितीस जुळेल इतका खोल केला होता. सांगण्याचें तात्पर्य काय, कीं हा आमचा साभिमान

मोठेपणा सांगत असतां अप्रत्यक्षपणें भौतिक शास्त्रांचा महिमा मान्य करीत असतों. एवढें महत्त्व या शास्त्रांना आपण काय म्हणून देतों ? असें त्यांत काय आहे, कीं त्याचा सर्वांनीं अभ्यास करावा, अभ्यास करील त्याला अभिमानास्पद व न करील त्याला लाजीरवाणें वाटावें ? याचा शोध केलाच पाहिजे.

## भोळ्या लोकांमुळें वर्चस्व वाढलें :

शास्त्रांचें हें वर्चस्व वाढण्यास कारणें तीन. पूर्वी पाश्चात्य देशांतून अज्ञानांध लोकांचें वर्चस्व होतें. दुसरें असें कीं शास्त्रांनीं अभ्यासास स्वतंत्र बुद्धीची दिशा दाखवून दिली. व तिसरें म्हणजे त्यांनीं लावलेले अजब शोध. पैकीं पाहिलें कारण जसें भौतिकावर विश्वास ठेवण्यास निमित्त झालें तसेंच अध्यात्माबद्दल तिरस्कार उत्पन्न करण्यासहि झालें. अध्यात्म वास्तविक दूरच होतें. परंतु खुळचट धर्मवेड्यांनीं जो अज्ञानीपणाचा प्रसार केला, एवढेंच नव्हे तर बुद्धिवाद्यांचा किंवा विरोध करणाऱ्यांचा त्यांनीं छळहि केला, त्यांनीं भक्ति आणि अडाणी अंधश्रद्धा यांची सरमेसळ केली. सदसद्विवेकबुद्धीवर आधारलेलें भारतीय अध्यात्म कोणाच्या गांवींहि नव्हतें. पण आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या नांवाखालीं वाटेल तो आचार व विचार धर्म म्हणून मानला जाऊं लागला पृथ्वीच्या उत्पत्तीविषयीं, ईश्वराच्या स्वरूपाविषयीं, इहपरलोकसंबंधीं व आत्म्याविषयीं खिस्ती व मुसलमानी धर्मांत तत्त्वशुद्ध विचार आढळत नाहीं. त्या काळीं जें काय लोकांत आदरस्थान होऊन बसलें होतें तें धर्माचारासाठीं धर्मग्रथांत समाविष्ट करून टाकलें. त्यांत दंतकथा, अडाण्यांच्या वरील विषयांसंबंधींच्या कल्पना इ० आल्या आहेत. ते ते धर्मग्रंथ त्या त्या धर्मांत सर्वप्रमाण मानले गेले असल्यामुळें त्यांतील प्रत्येक वाक्य हें वेदवत् समजलें जाऊं लागलें. पुढील काळांत तर त्या दंतकथांतील वचनां-

करितां लोकांचे हाल करण्यांत येऊं लागले. व धर्माची शिकवण तत्त्वप्रधान नसल्यामुळें, शब्दप्रमाण असल्यामुळें इतरांच्या सद्‌सद्विवेकबुद्धीस वाव मिळेनासा झाला. युरोपची ही अशा प्रकारची स्थिति आज इतिहासपूर्व काळापासून आहे.

आपल्या देशांत अशीच पण थोडी निराळी स्थिति होती. भेद थोडा आहे पण तो महत्त्वाचा आहे. युरोपप्रमाणेंच आमच्याकडे अज्ञ लोक होऊन गेले. त्यांनीं व कालानें रूढिगत कांहीं कल्पना प्रस्थापित केल्या. कांहींना तत्कालीन परिस्थिति कारणीभूत होती. व युरोपप्रमाणें आमच्याकडे दंतकथा प्रमाण सांगणारे कांहीं पुराणांसारखे ग्रंथहि आहेत. तथापि धर्म तेवढ्यांतच संपला नाहीं. या पुराणांपेक्षाहि सर्वश्रेष्ठ प्रमाणभूत असणारे वेद, उपनिषदें, षड्दर्शनें भगवद्गीता इत्यादि तत्त्वज्ञानाचे ग्रंथ होते. त्यांत चर्चिलेलीं तत्त्वें तीं अध्यात्मतत्त्वें होत. पुराणें होतीं तीं धर्मग्रंथ नसून त्यांचें प्रामाण्यहि सापवादच होतें. तेव्हां युरोमधील भोळे लोकच काय पण त्यांचे धर्मग्रंथहि त्यांच्या ऐतिहासिक पुराव्यासहित भारतीय अध्यात्माचें खंडन करण्यास योग्य नाहींत व आमच्यांतील अंध रूढीहि या वादांतून एकदम वगळल्या पाहिजेत. पण विज्ञानबोधाची प्रस्तावना या भोळ्या विधानांवरच आधारलेली आहे. अर्थात् तिचा फोलपणा सिद्ध करण्यास दुसऱ्या कशाची आवश्यकता नाहीं.

परंतु या भोळ्या जगाच्या मानानें शास्त्रज्ञांची बुद्धीहि पुष्कळच सदसद्विवेकपुरस्सर होती. त्यामुळेंच शास्त्रांचें वर्चस्व आज टिकून आहे. शास्त्र हें प्रत्येक वस्तूची निरपेक्षपणें चिकित्सा करून बुद्धीला पटेल तेंच ग्राह्य धरतें. शास्त्राचा हा मोठा गुण आहे. परंतु हाच गुण जर सर्वांना आकर्षक वाटत असेल तर अध्यात्मतत्त्वज्ञान त्याहून चिकित्सक व खोल आहे. परंतु युरोपमध्यें अध्यात्माचें नांवहि नसल्यानें अर्थात् तेथें शास्त्रांचें प्रामाण्य वाढलें. आणि त्याची सिद्धता जास्त डोळ्यांत भरण्याचें कारण त्यांचा संग्राम भोळ्यांशीं

झाला. पाप्याच्या पितराला चीत करण्यास काय शक्ति लागणार आहे ? एखादा सामान्य मनुष्यहि तें काम झटकन् करूं शकेल. पण त्यावरून त्या माणसाची शक्ति अफाट असें मानतां येत नाहीं. शास्त्रें सदसद्विवेकपूर्ण आहेत यांत शंका नाहीं. पण कस किती ? सोनें असलें तरी त्याला शंभर नंबरापर्यंत कस असतो. पण भोळयांना नंबरच लागत नाहीं. म्हणजे त्यांचा कस एकाखालीं शून्य आहे.

## पुरस्काराचें प्रयोजन ?

आणि म्हणूनच शास्त्रांचें तर्कशुद्ध म्हणून स्तोम फार झालें. मनुष्यानें व्यवहारांत अंधश्रद्धा न बाळगतां सदसद्विवेकबुद्धि वापरावी, डोळसपणें चालावें म्हणूनच प्रा. माटे शास्त्रांच्या शिक्षणाचा पुरस्कार करीत आहेत ना ? मग तर्कशुद्धता व ती मनाची घडण अध्यात्म तत्त्वज्ञानानें अधिक होते. त्यांत बुद्धीला वाव आधिक आहे. जर जीवन सुखी करण्याकरितां म्हणत असतील तर पाश्चात्यांचें जीवन सुखी न होतां अधिक अस्वस्थ झालें आहे. हें तेथील समाजशास्त्राच्या अभ्यासानें सहज समजण्यासारखें आहे. देशाच्या संरक्षणासाठीं व इतर देशांना तोंड देण्यासाठीं भौतिक शास्त्रांचा पुरस्कार करीत असतील तर तेवढ्यासाठीं अध्यात्माची निंदा– तें समजून न घेतां– करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. देशाचें व समाजाचें संरक्षण करण्यासाठीं लागणारीं शास्त्रें अध्यात्माच्या मुळींच आड येत नाहींत. क्षत्रियधर्म हा हिंदुतत्त्वज्ञानांत वर्ज्य मानलेला नाहीं. तथापि बहुजनसमाज वरील विचार करीत नाहीं. अजब शोध आणि विचारक्षमता या दोनच गुणांनीं शास्त्रांनीं सर्व जग जिंकलें.

## मनुष्याची निसर्गावर मात :

विसावें शतक विद्यामंदिराचा कळस आहे. येथपर्यंत पोंचण्यास मनुष्यास अनेक शतकाचा प्रवास करावा लागला. जसजसा मनुष्य पुढें चाल करूं लागला, तसतशी त्याची शास्त्रीय दृष्टि वाढूं लागली. निसर्गातील अनंत घटनांचें त्यानें निरीक्षण केलें. कांहीं अफाट शक्तीनें उन्मत्त झाले होते त्यांना लगाम घातली; तर कांहींना आपलें व्यक्तिमत्त्वच विसरल्यासारखें झालें होतें त्यांना त्यांच्या सुप्त सामर्थ्याची जाणीव करून दिली. निसर्ग हें एक मोठें साम्राज्य कल्पून त्याचा गतेतिहास शोधून काढला. एवढेंच नव्हे तर भविष्यत्-आयुष्यहि त्यास समजावून दिलें. मनुष्यानें त्याचा मोबदलाहि भरपूर घेतला. निसर्गाचे अधिकारी मनुष्य आपल्या कामासाठीं वेठीस धरूं लागला. आपली जात फारच लांबवर पसरली असून एकमेकांस भेटणें अशक्य झाल्यामुळें ती जात ज्या पृथ्वीवर उभी आहे त्या पृथ्वीची लांबी रुंदी तशीच कायम ठेवून सर्व पृथ्वी जवळ आणली. एका टोकाचा मनुष्य दुसऱ्या टोकाच्या माणसाला पाहूं शकतो, त्याचें बोलणें ऐकतो, आपण त्याच्याशीं बोलतों, आतां त्याला स्पर्शहि करूं शकेन अशी त्याची महात्त्वाकांक्षा आहे. निसर्गाच्या मोठ्या अधिकाऱ्यापैकीं विद्युत् ही एक मोठी अधिकारी आहे. पण मनुष्य आपल्याकरितां तिला इतकी धावपळ करावयाला लावतो कीं, त्या बिचारीची अगदीं तारांबळ उडून जाते. पण मनुष्य असलें स्त्रीदाक्षिण्य मानावयास तयार नाहीं. निसर्गातील कःपदार्थ समजल्या गेलेल्या अणुरेणूंत केवढी शक्ति आहे याची त्याला आपण सिंह असल्याची जाणीव करून दिली. त्याचा मोबदलाहि मनुष्यानें आपल्या जीवनांत किती तरी घेतला आहे. अशा एक ना दोन, सृष्टीच्या हजारों प्रजाजनाना मनुष्य आपल्या वेठीस धरीत आहे. मग निसर्गाला लोक कमी पडतील तर मनुष्य आपल्या बुद्धींतून वसिष्ठाच्या काम-

धेनूप्रमाणें नवीन नवीन प्रजाजन निर्माण करीत आहे. पण आतां अशीहि भीति वाटूं लागली आहे कीं, हा प्रतिसृष्टि तर निर्माण करणार नाहीं ना ?

## हें सामर्थ्य शास्त्रांचें आहे :

मनुष्यानें एवढें सामर्थ्य कमावलें तें बुद्धिमत्तेच्या अर्थात् शास्त्रांच्या बळावर. दुर्योधनाचें सामर्थ्य त्याच्या मांडींत होतें, मारुतीचें त्याच्या शेपटींत होतें, कर्णाचें त्याच्या कवचकुण्डलांत होतें, तर मनुष्याचें सामर्थ्य त्यानें बनविलेल्या शास्त्रांत आहे. मनुष्यानें शास्त्रांत केलेली प्रगति सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे. अनेक शास्त्रज्ञ एका-पुढें एक मजल दर मजल करीत झपाट्यानें पुढें चालले आहेत. रोज नवीन कल्पना काढतात आणि त्यांचें सत्य सृष्टींत प्रत्यन्तरहि दाखवून देतात. त्यांच्या शास्त्रीय कल्पनेप्रमाणें प्रत्यक्ष अनुभवास येतें, त्यांतून नवीन अनुमानें निघतात, तीं खरीं ठरतात, निसर्गांतील घटना त्याप्रमाणें प्रत्ययास येत आहेत. आणि त्यांच्या कल्पनेचीं गोड फळें भौतिक साधनांच्या योगानें आपल्याला चाखावयास मिळतात. त्या अर्थीं ज्या तत्त्वावर हें एवढें प्रभावी शास्त्र आधार-लेलें आहे तें तत्त्व सत्य असल्याशिवाय त्याचा प्रत्यय येणार नाहीं असें वाटल्यास त्यांत सकृद्दर्शनीं आश्चर्य नाहीं.

## शास्त्रीयत्वाचें जग :

याप्रमाणें शास्त्रांच्या वाढीमुळें आणि त्यांतून निष्पन्न होणाऱ्या बौद्धिक आणि भौतिक प्रत्ययांमुळें जनमतावर शास्त्रांचा पगडा अतिशय बसला. जगांतील राष्ट्रांतून हा फरक स्पष्ट दिसूं लागलाच;

पण वैयक्तिक बाबतींतहि त्याचें प्रत्यंतर दिसूं लागलें. अंधश्रद्धा अंधकारांत दडून राहिली. बुद्धिवाद फैलावला. विचारस्वातंत्र्य उदयास आलें. नवीन शास्त्रीय दृष्टि मिळाली. हा सर्व परिणाम भौतिक शास्त्रांच्या प्रगतीचाच आहे. समाजांत ठायीं ठायीं शास्त्रीयता भरून गेली. सामाजिक घटनांचें 'शास्त्रीय' कारण वा उपपत्ति शोधण्याची प्रथा निघाली. त्यांतूनच सामाजिक शास्त्रांचा उदय झाला. कोणतीहि गोष्ट निर्दोषपणें करणें याला 'शास्त्रीय पद्धतीनें करणें (Scientific)' हा शब्दप्रयोग रूढ झाला. निर्दोष, तर्कशुद्ध याला 'शास्त्रीय' (Scientific) हा प्रतिशब्द आला. किंबहुना तर्कशुद्धता किंवा तत्त्वशुद्धता म्हणजेच शास्त्रीयत्व असें समीकरण झालें. शेवटीं पहिले दोन शब्द गाडले जाऊन 'शास्त्रीयता' हा शब्द सर्वमान्य झाला. थोडक्यांत, मानवी बुद्धीचा आदर्श म्हणजे शास्त्रीयत्व असा अर्थ झाला.

हिंदुसमाजांतहि 'शास्त्र' हा शब्द धार्मिक विषयांत प्रचारांत आहे. तथापि तेथें तो मर्यादित स्वरूपांत वापरला जातो. शास्त्र म्हणजे एक तर्कशुद्ध पद्धति किंवा तंत्र याच दृष्टीनें या शब्दाचा उपयोग केला जातो. योगशास्त्र, धर्मशास्त्र, यज्ञांतील विधींचें शास्त्र, किंवा शास्त्रोक्त विधि म्हणजे तंत्रशुद्ध विधि एवढाच शास्त्र शब्दाला अर्थ आहे. तंत्रशुद्धता म्हणजे शास्त्र. पण यापलीकडे शास्त्रांचा बोज नाहीं.

## भौतिकशास्त्रांचा आधार :

जें आपण गृहीत धरतों (Assume) त्याची सत्यता अनुभवास आल्याशिवाय पटत नाहीं. अनुभव प्रतिकूल आल्यास आधारार्थ घेतलेलें गृहीत (Basic assumption) असत्य आहे आणि अनुकूल आल्यास तें गृहीत सत्य असलेंच पाहिजे. आणि ज्या अर्थी शास्त्रानें आजपर्यंत गृहीत धरलेलीं तत्त्वें (Hypotheses) अर्धवट

होतीं, सत्यासत्यनिरपेक्ष होतीं ( Unproved; supposed to be true ). तथापि संशोधनाच्या सोयीकरितां म्हणून तीं सत्य आहेत असें गृहीत धरून शास्त्र चाललें. प्रयोगांतीं कांहीं असत्य ठरलीं, तर कांहीं सत्य ठरलीं. सत्य म्हणून सिद्ध झालीं त्या तत्त्वांच्या नियमानुसार इतर अनुमानेंहि प्रत्ययास आलीं. अर्थात् तीं तत्त्वें ( Hypotheses ) अमान्य करतां येत नाहींत. अशा प्रयोगांतीं सिद्ध झालेल्या तत्त्वांवरच आजचें शास्त्र उभें आहे.

## शास्त्रांचें कार्यक्षेत्र :

पदार्थविज्ञानांतील आधारभूत तत्त्वें त्या शास्त्रांतील प्रत्येक घटना नी नियम स्पष्ट करण्यास समर्थ आहेत. त्याप्रमाणें रसायन सर्व रासायनिक द्रव्यांचे गुणधर्म स्पष्ट करतें. प्राणिशास्त्र प्राण्यांचे गुणधर्म नियमित करून अमुक एका प्राण्यांचें वैशिष्ट्य असें कां तें समजावून देतें. तात्पर्य काय, प्रत्येक शास्त्रानें एक एक प्रांत आपल्याकडे घेऊन त्यांतील सर्व घटना शक्य तों स्पष्ट करण्याची हमी घेतली आहे. केसांवर कंगवा घासला असतां त्या कंगव्याला कागद कां चिकटतो तें पदार्थविज्ञान स्पष्ट करील. माहीत नसल्यास म्हणजे त्यानें घालून दिलेल्या नियमांत बसत नसल्यास, त्याकरितां स्वतंत्र नवीन नियम काढील पण ईश्वराकडे बोट दाखवून कानांवर हात ठेवणार नाहीं. तांब्याच्या भांड्यात ताक हिरवें कां होतें याचें उत्तर रसायन आपल्या पृथक्करणपद्धतीनें निरनिराळीं द्रव्यें एकत्र आलीं असतां त्यांचा काय परिणाम होतो तें सांगेल. उंटाला मान लांब आणि बैलाला आंखूड कां हा प्रश्न प्राणिशास्त्र आपले नियम काढून सोडवून दाखवील. याचप्रमाणें इतर शास्त्रांचें आहे. सांगावयाचें एवढेंच कीं, शास्त्र निसर्गांतील घटनेचें स्पष्टीकरण करतें. एखादी घटना अशी का याचें उत्तर शास्त्र देतें. हें स्पष्टीकरण म्हणजे

शास्त्रानें आपले नियम ठरविले आहेत. त्या नियमांत पृष्ट घटना बसवून दाखवितें आणि त्या नियमांनुसार घटनेवर विशिष्ट परिणाम घडतो हें सांगतें ( Instance under law ). नैसर्गिक घटनांचें स्पष्टीकरण करणें हें शास्त्र आपलें ध्येय आणि कार्यक्षेत्र समजतें. स्पष्टीकरण हा शास्त्राचा आत्मा आहे.

## स्पष्टीकरण व्यावहारिक नको :

परंतु हें झालें व्यावहारिक स्पष्टीकरण. सामान्य व्यवहारी माणसाला शास्त्रास माहीत असलेले नियम माहीत नसतात ते माहीत करून देऊन त्यांत ती घटना बसवून देणें म्हणजे व्यवहाराच्या दृष्टीनें तें स्पष्टीकरण झालें. धातु तापवला म्हणजे लांबतो हें धातूचा पदार्थ तापवला असतां मोठा कां होतो याचें स्पष्टीकरण झालें. परंतु हें स्पष्टीकरण व्यावहारिक आहे, शास्त्रीय नाहीं. अशाच प्रकारचीं स्पष्टीकरणें इतर शास्त्रें देतात. व्यवहाराला शास्त्रीयता आणण्याचा हा एक सुलभ मार्ग आहे, केवळ नियम सांगणें वा तात्कालिक कारण सांगणें यानें शास्त्रीयतेचें समाधान होणार नाहीं, व्यवहाराचें होईल. तो नियम व्यवहाराला माहीत नसतो म्हणून श्मशानातील जाळ, जंगलांतील आपल्या आवाजाचा प्रतिध्वनि, इत्यादि घटना व्यावहारिक माणसाला आश्चर्यकारक वाटतात. या आश्चर्यकारक घटना नियमांत बसवून दाखविणें यांत कांहीं शास्त्रांची खरी कसोटी लागत नाहीं. कारण श्मशानांतील जाळ दलदलित जमिनीवरील फॉस्फरसयुक्त हाडांमुळें होतो हें त्या जाळाचें तात्कालिक कारण झालें. परंतु अशा प्रदेशांत फॉस्फरसचा जाळ कां व्हावा याला उत्तर काय ? ज्वलनक्षमता ही फॉस्फरसची प्रकृति आहे. पण ती प्रकृति या वस्तूला का असावी अशी पृच्छा केली तर ? आम्ल पदार्थांत निळा लिटमस टाकला तर तो तांबडा का व्हावा ? निळा कागद

तांबडा कसा होतो याचें आम्ल पदार्थ हें उत्तर येईल. परंतु आम्लावर ही प्रक्रियाच मुळांत कां व्हावी असा प्रश्न केला तर ? प्राणवायु ज्वलनक्षम कां ? हैड्रोजनचे अणुरेणू हलके कां ? अशा शंका काढल्यास शास्त्रांजवळ काय उत्तरें आहेत ? म्हणजे निसर्गाचे जे मूळ गुणधर्म आहेत तेथें त्यांची मति कुंठित होते. शास्त्रांची पोंच पुढें जाऊं शकत नाहीं. नवीन शोध म्हणजे काय ? निसर्गांतील एखादा नवीन गुणधर्म किंवा वस्तु किंवा शक्ति यांचा शोध. परंतु त्या शोधाचें 'कां' याला उत्तर काय ? येथें शास्त्रांची मर्यादा संपली.

## कार्यकारणभाव पाहिजे :

शास्त्र हें प्रगतिशील आहे असें असलें तर वस्तूच्या आजच्या व्याख्येसहि भावी काळांत स्थित्यंतरें आहेत हें दुर्लक्षून चालणार नाहीं. आतांपर्यंत शास्त्रानें विश्व असें आहे हें शोधण्याचें काम केलें. आणखीहि बरेच दिवस हें पुरेल. पण शास्त्र प्रवाही असल्यानें एक दिवस असा येईल कीं हा प्रवाह भूप्रदेश सोडून सागराला मिळेल. म्हणजे विश्व संपल्यावर किंवा निदान विश्वांतील घटना काय आहेत तें समजल्यावर पुढें काय ? पुढें, त्या घटना कोठून आल्या व कां आल्या हेच प्रश्न पुढें दत्त म्हणून उभे राहणार. अर्थात त्या वेळीं एखादें नैमित्तिक कारण सांगून किंवा दुसऱ्या एखाद्या नियमांत ती घटना बसवून दाखवून भागणार नाहीं. खऱ्या शास्त्रज्ञाचें त्यानें कधीं समाधान होणार नाहीं. त्याचें 'कां' हें ब्रीदवाक्य आहे. तो 'कां'नेंच श्वासोच्छ्वास करीत असतो. त्याची महत्त्वाकांक्षा ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ शोधून काढण्याची आहे. तेव्हां, तो सांगितलेल्या नियमालाहि 'कां' व 'कसें' असे प्रश्न केल्यावांचून राहणार नाहीं. तर्कशास्त्रांत उत्तम स्पष्टीकरणाची व्याख्या कार्यकारणभाव (Causal relation) स्पष्ट करणारें म्हणून सांगितलें

आहे. पृष्ठ घटनेचें मूळ कारण शोधणें हेंच तर्कशास्त्राच्या उच्च प्रतीचें स्पष्टीकरण होऊं शकेल. घटनेचें निमित्त देऊन घटनेचा कार्यकारण-भाव सिद्ध होत नाहीं. परंतु शास्त्र नियमापलीकडे जात नाहीं. नियम नसेल तेथें नवीन तयार करणें एवढेंच शास्त्र करतें. त्यामुळें स्पष्टीकरण अर्धवट राहतें; कार्यकारणभाव उपलब्ध होत नाहीं. पण शास्त्रांची मर्यादाच यापुढें संपुष्टांत येते.

## जडरूप अभ्यासाकडून तत्त्वरूप अभ्यासाकडे :

यापुढील कार्यकारणभाव शोधणें म्हणजे येथपासून तत्त्वज्ञानाचा प्रांत सुरू झाला. या प्रांतांत पाऊल टाकतांच एका विशिष्ट जड-वस्तूवरील एकाग्रता नष्ट होते. कारण शास्त्रानें घालून दिलेल्या नियमापलीकडे संचार करूं लागलों म्हणजे जडवस्तूचें एकत्व आणि विशिष्टत्व लोप पावतें. शास्त्रीय नियमापर्यंत प्रयुज्य (under experiment) वस्तूचा जड अभ्यास असतो. आणि नियमापलीकडे तो तत्त्वरूप अभ्यास होतो. प्रयुज्य विषयास अनेकत्व, व्यापकत्व प्राप्त होतें. कारण नियमापलीकडील प्रांतांत आपण जी वस्तु घेऊन संचार करतों आणि त्या वस्तूविषयीं शंका उत्पन्न होऊन त्यांना आपण उत्तरें देण्याचा प्रयत्न करतों त्या शंका आणि तीं उतरें विश्वांतील प्रत्येक जड वस्तूला लागू असतात. शास्त्रीय नियमापर्यंत वस्तूचा अभ्यास त्या वस्तूपुरताच असतो. त्याविषयीं निघणाऱ्या शंका व त्यांचीं उतरें हीं फक्त त्या वस्तूलाच उपयोगी पडतात. अभ्यास नियमापलीकडे जातांक्षणींच त्याला व्यापकत्व येतें. तो सर्वग्राही होतो. म्हणजेच अभ्यास तत्त्वरूप होतो. या तत्त्वरूप अभ्यासास आपण तत्त्वज्ञान अशी संज्ञा देतों. जडरूप अभ्यासाप्रमाणें तत्त्वरूप अभ्यासांतील शंका अलग आणि स्वतंत्र नसते. तत्त्वरूप अभ्यासां-

तील शंकांची एक-सांखळी असते. एका शंकेचें निरसन करतां करतां दुसरी उत्पन्न होते. व तिचें निरसन केल्याशिवाय पहिलीचें निरसन करतां येत नाहीं. याप्रमाणें कारणपरंपरा पुढें जात जात शेवटीं अनंतत्वाचें क्षितिज दिसूं लागतें. या वेळीं भौतिक शास्त्रांच्या सीमा अनंत योजनें लांब असणाऱ्या पाठीमागील क्षितिजावर अस्तमान होत असतांना दिसतात. त्या सीमेवर उभे राहून जडवस्तूचें बाह्यांग निरीक्षणारा शास्त्रज्ञ जणूं एक सूक्ष्म कणाच्या क्षेत्रफळाएवढा दिसतो. त्याच्या हातांतील प्रयुज्य जडवस्तु तर अदृश्यच वाटते. त्या अनंत अवकाशांत विशाल दृष्टिक्षेप केल्यावर शास्त्रज्ञाच्या जडवस्तू आणि त्यांचें नियमीकरण नि अपवाद यांचा ठावठिकाणाच लागत नाहीं. शास्त्रानें केलेले आणि पुढें करावे लागणारे अनंत नियम ध्यानांत आले म्हणजे 'नियम' या तत्त्वाला कांहींतरी अर्थ असूं शकेल काय याची जबरदस्त शंका येऊं लागते. अनंत विश्वाच्या चित्रविचित्र किरकोळ घटनांना जडवस्तूच्या जड अभ्यासानें नियमबद्ध करूं पाहाणें म्हणजे गवताच्या काडीनें गगनाला गवसणी घालण्यासारखें आहे. एवंच, तत्त्वरूप अभ्यासाचें क्षेत्र जें तत्त्वज्ञान तें केवळ जडांत नाहीं, केवळ सूक्ष्मात नाहीं; तें अनंत आकाशांत व्यापून आहे, तें जडापलीकडे आहे, बंधनापलीकडे आहे, तें असीम आहे. त्याला केवळ बाह्य रंगरूप ओळखावयाचें नाहीं, त्यांचें नियमीकरण करून त्याचें समाधान होणार नाहीं. बुद्धीला बंधन राहणार नाहीं. दोन जडांच्या गुणधर्मांचा संबंध दाखवूनहि होणार नाहीं. त्या संबंधाचा आपल्या जीवनाकडे उपयोग करून तर नाहींच नाहीं. तत्त्वज्ञानाला जडसूक्ष्मांचा संबंध पाहावयाचा आहे. आणि सूक्ष्मांचा संबंध अनंताशीं लावावयाचा आहे. म्हणजे, शास्त्र तत्त्वज्ञानापेक्षां अनंत युगें मागें आहे, अनंत योजनें मागें आहे. शास्त्राची दृष्टि तत्त्वज्ञानाच्या अपार व्यापाला पोंचत नाहीं.

## भौतिक शास्त्रांचें स्वरूपच पालटलें :

संग्र. ८.१४१

प्रा. माटे म्हणतात, ब्रह्मांचा साक्षात्कार झाला म्हणजे ब्रह्म दिसलें. म्हणजे तें इंद्रियगोचर झालें. अर्थात् ब्रह्म ही वस्तु आहे. म्हणजे ब्रह्म हेंहि जडच झालें.

अविनाशी आणि विनाशी म्हणजे आध्यात्मिक व भौतिक किंवा सूक्ष्म आणि जड यांतील भेद योग्य तऱ्हेनें न समजल्यामुळें लोक घोटाळा करतात. जड म्हणजे उघड्या डोळ्यांना दिसेल तें व सूक्ष्म म्हणजे अज्ञात किंबहुना न समजण्याइतकें बारीक असा अर्थ प्रा. माटे धरून चाललेले दिसतात. पण हा अर्थ तत्त्वज्ञानांत अभिप्रेत नाहीं. सूक्ष्मता आणि जडता हे गुणधर्म त्यांच्या आकारावर अवलंबून नाहींत. त्याव्यतिरिक्त या दोन स्वतंत्र प्रकृतिधर्म आहेत. जड म्हणजे भौतिक वस्तु ( matter ), विनाशी वस्तु. सूक्ष्म म्हणजे एक प्रकारची शक्ति, अविनाशी शक्ति. विनाश आणि अविनाश हे त्यांचे दोन स्वतंत्र गुणधर्म आहेत. हे दोन्ही गुणधर्म एकात असणें अशक्य आहे. विनाशी आणि अविनाशी असे अर्थातच दोन भाग पडतात. वस्तु म्हणजे (matter) असा अर्थ घेतला तर नामरूपांकित भौतिक वस्तु म्हणजेच विनाशी वस्तु. किंबहुना जें विनाश पावतें ती वस्तु. मग अविनाशी म्हणजे शक्ति. जें स्वयंस्फूर्त ती शक्ति. जें परावलंबी ती वस्तु. याचा अर्थ शक्ति ही नित्य आहे आणि वस्तु ही अनित्य आहे. विश्वांत वस्तू अनंत आहेत. शक्ती फारच थोड्या आहेत. आत्मा व परमात्मा नित्याचें नित्याकडे आकर्षण. नित्याचें नित्याकडे पोषण. नित्याचें नित्यानें हित. अनित्याचा अनित्याकडे ओढा. अनित्याचें अनित्यानें हित. किंबहुना अनित्याला पोषण, आकर्षण, हिताहित या भावनाच नसतात. त्या असतात याचा अर्थ त्यामागें प्रेरणा आहे. प्रेरणा ही शक्तीचा गुणधर्म आहे. तेथें नित्यत्व आलें. म्हणजे त्यानें नित्याचें हित व्हावयाचें नाहीं. नित्य ही मूळ एक शक्ति आहे—

स्वयंस्फूर्त आहे, जननक्षम आहे, बहुरूपक्षम आहे. एका शक्तीच्या अनेक शक्तिरूपें होतात. ती परमात्म्याचें एकत्व अबाधित ठेवून अनंत आत्मे निर्माण करते. अर्थात् स्वयंस्फूर्त शक्तिमत्त्व तेथें वास करीत असतेंच. शक्तीचा वस्तूशीं संबंध आला असतां वस्तूला प्रेरणा मिळते. पण वस्तूचा शक्तीशीं संबंध आला असतां शक्तींत कांहींच फरक पडत नाहीं. विश्वाचा संसार वस्तूला मिळालेल्या प्रेरणेवर चालतो. म्हणजे वस्तु व शक्ति यांचें संमीलन होतें, उदा० विश्वांतील प्राणी ( वनस्पतिसुद्धां ). प्राण्यांचे देह वस्तू आहेत. त्यांचे प्राण शक्ती आहेत. वस्तू आणि शक्ति यांचा अशा तऱ्हेनें संयोग झाला असतां वस्तूस प्रेरणा मिळून ती स्वयंकार्यक्षम होते. ती वस्तु स्वयंभूत्व जाणूं शकत नाहीं. विशेष अभ्यासानें मनुष्य या वस्तूस तें शक्य आहे.

भौतिक शास्त्रांची जसजशी प्रगति होत चालली तसतशा इंद्रियाना प्रथम अगोचर वाटणाऱ्या वस्तू शास्त्रांनीं गोचर करून दाखविल्या. याचप्रमाणें शास्त्रात अजूनहि प्रगति झाली म्हणजे, किंवा ज्या कोण्या योग्यांना ब्रह्मसाक्षात्कार झाला असेल त्यांना ब्रह्म दिसलें आहे म्हणजे गोचर झालें आहे. अर्थात् या वेळीं आध्यात्मिकता लोप पावून भौतिकताच प्राप्त झाली म्हणावयाची. म्हणजे सूक्ष्म किंवा आध्यात्मिक असें कांहींच राहिलें नाहीं. सर्वच ब्रह्मासकट जड आहे असें त्यांचें म्हणणें असतें. पण आत्मा इंद्रियांना अगोचर असून बुद्धीलाहि अगम्य आहे असें गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत पंचविसाव्या श्लोकांत स्पष्ट म्हटलें आहे. नैषा तर्केण मतिरापि मतिरापनेया । ( कठ ) भौतिक शास्त्रें गोचरत्व आणि बुद्धीगम्यत्व याच दोन पायावर तर उभीं आहेत ! योग्याला जेव्हां ब्रह्मसाक्षात्कार होतो तेव्हां बुद्धीनें तर नाहींच पण तो इंद्रियांनीहि होत नाहीं. त्या वेळीं योगी इंद्रियातीत असतो. ब्रह्मसाधन इंद्रियातीत असतें. त्या वेळीं इंद्रियें आपलें नेहमींचें इंद्रियत्व सोडून

वागतात, म्हणजे इंद्रियांच्या भौतिक व्याख्येप्रमाणें व त्याप्रमाणें त्यांच्या कार्यप्रमाणें त्यांना इंद्रियेंच म्हणतां येत नाहींत. अर्थात् त्या वेळीं ब्रह्म इंद्रियगोचर होऊं शकत नाहीं. शास्त्रें जर इतकीं पुढें जाऊन ब्रह्म त्यांच्या दृष्टिक्षेपांत येऊं लागलें तर अशा स्थितींत आध्यात्मिक ब्रह्म भौतिक होणार नसून भौतिक शास्त्रें आध्यामिकता पावतील. त्या वेळीं भौतिक शास्त्रें आपलीं आधारभूत मूलतत्त्वें सोडून देतील, शोधनपद्धति बदलतील, आणि स्वरूपहि पालटतील. साधीच गोष्ट घेतली तर वर सांगितल्याप्रमाणें वस्तूच्या व्याख्येच्या स्थित्यंतरांवरून भौतिक शास्त्रें अगदीं ढोबळ जडाकडून सूक्ष्मातिसूक्ष्माकडे हळूहळूं कलत चाललीं आहेत हें दिसून येईल. Whitehead यांच्या Science and the Modern World या ग्रंथावरून भौतिक शास्त्राच्या पालटत्या स्वरूपाची पूर्ण कल्पना येते.

## शास्त्रांचीं मूलभूत तत्त्वें

शास्त्रांची दृष्टि तत्त्वज्ञानाच्या अपार व्यापाला पोंचत नाहीं. अर्थात् शास्त्राचें स्पष्टीकरण मर्यादित असणार हें निश्चित. हें अपुरें स्पष्टीकरण देणारें शास्त्र प्रभावी प्रत्यय कशाच्या बळावर देतें तें आतां पाहूं. प्रत्येक शास्त्राला आधारभूत मूलतत्त्वें (Fundamental assumptions) असतात. हीं मूलतत्त्वें असिद्ध (unproved) असलीं तरी तीं असिद्धय आहेत. ( They cannot be proved. ) तीं सिद्ध होऊं शकत नाहींत. परंतु सिद्ध होत नाहींत म्हणून असत्य आहेत किंवा (disproved) असें नाहीं. साधारणतः गृहीत सिद्ध होण्यासाठीं प्रयोग करावा लागतो. पण हें गृहीत मूलतत्त्व अप्रयुक्त (experiment impossible) आहे आणि यापुढेंहि तें अप्रयुक्तच राहील. तें प्रयोगानें सिद्ध होण्यासारखें नाहीं. बरें, तें सिद्ध नाहीं

म्हणून असत्य मानावें तर मानवी बुद्धीचा व्यवहारच खुंटेल. हें मूलतत्त्व म्हणजे विश्वसाम्यवाद (Uniformity of Nature.) विश्वसाम्यवाद म्हणजे निसर्ग नियमबद्ध आहे, प्रत्येक वस्तूला आणि घटनेला नियम आहे. त्या नियमाप्रमाणेंच विश्व चाललें आहे. प्रत्येक गोष्ट ठरून गेलेली आहे, कांहींहि स्वतंत्र नाहीं, स्वेच्छ नाहीं आणि भविष्यांत भूताची पुनरावृत्ति होईल.

या एका मूळ आधारभूत सर्वव्यापी आणि त्रिकालाबाधित तत्त्वावर विश्वाची प्रत्येक घटना आधारली आहे. हें मूलतत्त्व अमान्य करतां येत नाहीं. मानवी बुद्धीचें शास्त्रीय आणि व्यावहारिक कार्य याच तत्त्वावर आधारलेलें आहे. प्रत्येक शास्त्राचा पाया विश्वसाम्यवाद आहे. शास्त्र म्हणजे अत्यंत लहान पण अत्यंत मोठा अर्थ सांगणारें एक सूत्र आहे. नियमीकरण (ordering) म्हणजेच शास्त्र. एका नियमांत विश्वांतील जास्तींत जास्त घटना बसवून दाखविणें म्हणजे शास्त्र. पृष्ट वस्तूंना नियमबद्ध करणें म्हणजे शास्त्र.

## निरीक्षण आणि प्रयोग :

नियमीकरणाचें अमोघ शास्त्र म्हणजे निरीक्षण आणि प्रयोग. त्याच्या साहाय्यानें एका घटनेवरून अनेक घटना नियमबद्ध करणें हें शास्त्राचें ध्येय आहे. अर्थात् तें निरीक्षण अथवा तो प्रयोग हे प्रातिनिधिक असतात. एका प्रयोगावरून विश्वांतील कोणत्याहि टोकाची आणि कोणत्याहि काळाची वस्तु नियमबद्ध करतां येते. शास्त्राची भरधाव प्रगति, शास्त्राचा गाभा, शास्त्राचा आधार, शास्त्राची महत्त्वाकांक्षा, आणि कार्य सर्व कांहीं या प्रयोगनिरीक्षणांवर अवलंबून आहे. प्रयोग आणि निरीक्षण हे शास्त्राचे दोन पाय लुळे पडले तर पाण्याबाहेर तडफडणाऱ्या माशाप्रमाणें तें तडफडून

पंचत्वास जाईल ! पण प्रयोग आणि निरीक्षण हे दोन पाय विश्वसाम्य-वादावर उभे आहेत. विश्वसाम्यवाद खालून ओढून घेतला तर फांशी-साठीं उभे असलेल्या माणसाप्रमाणें शास्त्राचें मृत शरीर तसेंच लटकत राहील. तात्पर्य हेंच कीं, विश्वसाम्यवादामुळेंच शास्त्रें आज उभीं दिसत आहेत.

## विश्वसाम्यवादावरून नियमीकरण ?

पण हें विश्वसाम्यवादाचें तत्त्व काय आहे ? तें कितपत बलवान् आहे ? शास्त्राची बौद्धिक कठोरता तें तत्त्व सहन करूं शकेल काय ? निश्चितपणें नाहीं. विश्वसाम्याचा नियम निव्वळ व्यावहारिक आहे, दुबळा आहे, अशास्त्रीय आहे आणि तर्कशुद्ध नाहीं. शास्त्राचें शास्त्रीयत्व कशांत आहे हें आपण मागें पाहिलें. एका प्रातिनिधिक प्रयोगावरून एक नियम बांधून त्यावरून जगांतील शक्य ती वस्तु त्या नियमाखालीं आणणें, एकावरून अनुमान काढणें, त्यावरून नियम बसविणें हें शास्त्राचें कार्य असें आपण पाहिलें. त्या नियमांत व प्रयोगांत तात्त्विकता पाहिजे. प्रत्येक अनुमानास सबळ कारण पाहिजे— शास्त्रीय कारण पाहिजे. शास्त्र जर प्रत्येक वस्तु घेऊन तिच्यावर प्रयोग करूं लागलें तर तें शास्त्रीय होणार नाहीं. कारण तो (व्यावहारिक )अनुभव झाला. पण प्रत्यक्ष अनुभवामागें तत्त्व ( theory ) पाहिजे. तथापि प्रत्येक वस्तूचा प्रयोग अव्यव-हार्य व अशक्य आहे. एकावरून अनेकांचें अनुमान काढणें यांत तर शास्त्रीयता आहे. कारण अनुमान काढतों तेव्हां त्या-मागें theory अवश्य आहे. शिवाय शास्त्रानें नास्तिपक्षी घटनाहि ( Negative Instances ) लक्षांत घेतल्या पाहिजेत. नाहीं तर तर्कशास्त्रदृष्ट्या तो प्रमाद ( fallacy of non-observation. ) घडेल.

## मूलतत्त्वाची सत्यासत्यता :

विश्वसाम्यवाद हें सिद्ध तत्त्व नाहीं; अनुभवजन्य, प्रयोगजन्य तत्त्व नाहीं; हें आपण मागें पाहिलेंच आहे; पण मग त्याला आधार कोणता ? अनुभव म्हणावा तर अनुभव तितक्याच बळानें उलटहि येतो. निसर्गात एक नियम नाहीं, एक सूत्र नाहीं, हें अनंत उदाहरणें देऊन सिद्ध करतां येईल. विश्वांतील साम्य हें आदितत्त्व (a priory) आहे. त्याला कां हा प्रश्न विचारतां येत नाहीं. तें तर्कशास्त्रानें सिद्ध करूं लागलांत तर जें सिद्ध करावयाचें तेंच गृहीत धरावें लागेल ( Petitio Principia ). परंतु या तत्त्वावांचून पुढें जातांच येणार नाहीं. प्रयोग स्वतःच ज्या तत्त्वावर उभा आहे त्या तत्त्वाचा प्रयोग अतर्क्य आहे !

तें एक आधारभूत मूलतत्त्व ( Postulate ) आहे याचा अर्थ त्याच्या सत्यतेविषयीं शंका न घेतां तें सत्य आहे असें गृहीत धरून पुढें चालावयाचें आहे. तें निःसंशय सत्यतत्त्व आहे म्हणून नव्हे तर त्या तत्त्वाप्रमाणें पुष्कळ वेळां आपल्या अनुभवास येतें व ती आपली अपेक्षा आहे. निसर्गात एकसूत्र असावें ही आपली सदिच्छा आहे. असा आपला ईश्वराजवळ दावा आहे. जर निसर्गात आपण समजतों त्याप्रमाणें एक नियम झाला तर निसर्ग सुरळित चालेल अशी आपली महत्त्वाकांक्षा आहे. हें मूलतत्त्व गृहीत धरल्यानें बरेचसे प्रश्न सुटतात. बुद्धीला वाव मिळतो. सुटलेल्या प्रश्नांनीं मनाचें समाधान होतें. तसेंच तें तत्त्व मानल्यानें आपली पुष्कळच सोय होते, म्हणूनच आम्ही हें तत्त्व जरी सिद्ध आणि म्हणून सत्य नसलें तरी तें तसें आहे असें मानायचें आहे. नाहीं तर विद्येची प्रगति खुंटेल. मनुष्याचा व्यवहार स्थगित होईल.

## आमच्या सोयी :

नाहीं तर या अंधतत्त्वाच्या खांद्यावर माणसानें बसलें नाहीं तर जगाचा व्यवहारच स्थगित व्हायचा. निसर्गांत एकसूत्र आहे, तो नियमबद्ध आहे, असें एकदां मीं गृहीत धरलें म्हणजे माझ्या हातांतील सोनें पारखून त्याच जातीच्या सोन्याची परीक्षा तें विलायतेंतील असलें तरी मी करूं शकतों. ऑस्ट्रेलियांतील पाण्याचे गुणधर्म अमेरिकेंतील पाण्याचे गुणधर्मावरून बेधडक सांगूं शकतों. हिंदुस्थानांतील तांबें जर विद्युत्प्रवाहाला अनुकूल असेल तर जगांतील कोणतेंहि तांबें विद्युत्प्रवाहाला अनुकूल असलेंच पाहिजे. दक्षिण-ध्रुवावरील ऑक्सीजनचे गुणधर्म आणि उत्तर-ध्रुवावरील ऑक्सीजनचे गुणधर्म सारखेच असेल पाहिजेत. या देशांतील शास्त्रज्ञ दोन थेंब घेऊन एखाद्या रसायनावर प्रयोग करतो आणि जगांतील वाटेल तेथील वाटेल त्या प्रमाणांत असलेल्या द्रव्याचे गुणधर्म अजमावतो. पण यासाठीं त्याला त्या द्रव्याचा थेंब तपासावा लागत नाहीं. ( आणि तपासला तर ती शास्त्रीय पद्धति होणार नाहीं.) लोखंड म्हणजे काय हें आज आम्ही प्रयोग करून समजावून घेतों आणि त्यावरून दहा हजार वर्षांपूर्वीचा पदार्थ जमिनींतून खणून काढून तो लोखंड आहे, दगड आहे किंवा कोळसा आहे हें जाणूं शकतों.

## निरीक्षण-प्रयोग शेवटीं अशास्त्रीयच !

भौतिक शास्त्रांतील प्रयोग करण्याची पद्धति ही तर्कशास्त्रांतील एकमान म्हणजे एकावरून अनुमान काढण्याची—inductive पद्धति आहे. त्यांतसुद्धां ती enumerative आहे, या पद्धती

अशास्त्रीय–unscientific methods–आहेत असें तर्कशास्त्र सांगतें. प्रथम जरी शास्त्रीय प्रयोग– scientific method of experiment & observation केला, तथापि तो सर्वत्र लागू होतो, म्हणजे केवळ कांहीं उदाहरणें घेऊन सिद्ध केला जातो. आणि बाकीचे विश्वसाम्यवादानें (Uniformity of Nature) एका नियमांत ओढलीं जातील म्हणजेच शेवटीं enumerative induction येतें.

सारांश, सर्व भौतिक शास्त्रांचा पाया असा अशास्त्रीय आहे. सिद्ध न झालेल्या आणि होऊं न शकणाऱ्या मूलतत्त्वावर शास्त्रांची मदार आहे. मागें सांगितल्याप्रमाणें स्पष्टीकरणाची पद्धतीहि श्रेष्ठ प्रतीची (Causal relation) नाहीं. या पायावर उभें राहून तत्त्व एकदां मान्य केल्यावर मग शास्त्रीय अनुमानें अनुभवास येतील यांत शंका नाहीं. पण तीं सत्य कां असा प्रश्न केला तर ! याला समाधानकारक उत्तर नाहीं.

## ८ : : : अधिष्ठान निराळेंच हवें

मागील विवेचनावरून आपण ज्या शास्त्रांचा श्रेष्ठ विचारप्रणाली म्हणून पुरस्कार करतों तीं शास्त्रें तत्त्वशुद्ध नाहींत हें स्पष्ट होईलच. हीं शास्त्रें तत्त्वशुद्ध कशीं करतां येतील याचा किंवा ही शास्त्राभ्यासाची पद्धति तरी मुळांत बदलावयास हवी याचा विचार करणें आवश्यक आहे. शास्त्राचा भराभर पुढें अभ्यास चालू ठेवण्यापेक्षां प्रथम त्याचा पाया शुद्ध करणें हें महत्त्वाचें ठरेल. जर शास्त्राच्या विचारप्रणालींतून हें अशक्य असेल तर तत्त्वज्ञानाच्या विचारप्रणालीस जागें करावयास हवें आहे. याशिवाय मागील सर्व विवेचनावरून शास्त्रांचा सामाजिक दृष्ट्या विचारहि नव्या भूमिकेवरून करणें आवश्यक आहे. १९३९ सालीं इंग्लंडमध्यें J. D. Barnal यांनीं 'Social Function of Science' या ग्रंथांत सध्याची शास्त्रीय अभ्यासाची घातक पद्धति, त्याचा सामाजिक दृष्ट्या होणारा अनिष्ट परिणाम, शास्त्रीय अभ्यासाची पुनर्घटना व पद्धतशीर अभ्यास याविषयीं उद्बोधक विचार मांडले आहेत. चालू असलेल्या शास्त्रीय अभ्यासानें म्हणजे भौतिक साधनसिद्धतेनें वैयक्तिक सुख आणि सामाजिक सुधारणा होऊं शकत नाहीं हें स्पष्टच आहे. वीतभर पोट भरण्यासाठीं गुन्हे करावे लागतात. म्हणजे गुन्ह्याचें बव्हंशीं कारण दारिद्र्यांत सांपडतें. अर्थात् दारिद्र्यनाश हा महत्त्वाचा उपाय आहे. परंतु ज्या पाश्चात्य देशांत दारिद्र्यनाश होऊन संपत्ति सुलभ झाली आहे, त्या देशांतील गुन्ह्यांचें प्रमाण आणि त्यांची कारणमीमांसा पाहिली

म्हणजे दारिद्र्य हें महत्त्वाचें मूळ नसून मुख्य कारण दुसऱ्याच कशांत तरी असलें पाहिजे हें सिद्ध होतें. शिक्षणानें मानवी मन सुसंस्कृत होऊन ती व्यक्ति समाजाचा एक महत्त्वाचा कार्यक्षम घटक बनूं शकते म्हणून शिक्षणाचा सर्वत्र प्रसार करण्यांत आला व अशिक्षित मनुष्य जेमतेम औषधासच मिळेल अशी स्थिति आली. तथापि परिणाम अपेक्षेप्रमाणें होत नाहीं हें शाळा-कॉलेजां-तील विद्यार्थ्यांच्या वर्तनाच्या अभ्यासानें सहज ध्यानांत येईल. पाश्चात्त्य विद्यार्थ्यांमधील अनीतीचा परिपोष हें सुसंस्कृतपणाचें लक्षण म्हणतां येत नाहीं. गुन्हेगारांच्या संख्येंत सुशिक्षित पदवी-धरांचें प्रमाण दुर्लक्षणीय नाहीं हें लक्षात घ्यावयास हवें. विवाह आणि घटस्फोट यांच्या सरासरीवरून सुशिक्षितांत कौटुंबिक व पर्यायानें सामाजिक जबाबदारीपेक्षां तन्निरपेक्ष वैयक्तिक अनियंत्रित सुखलालसाच दृष्टोत्पत्तीस येते. याचें रूपांतर पुढें सामाजिक प्रश्नांत होऊन तो राष्ट्रापुढें एक कठीण प्रसंग निर्माण करून ठेवीत आहे. मध्ययुगांतील भोळसटपणा, अंधभक्ति हीं नाहींशी करून मनुष्य स्वतः विचार करूं लागला व बुद्धिवादावर मानवी जीवन जगवावें यासाठीं भौतिक शास्त्रांचा पुरस्कार आणि प्रचार करण्यांत आला व जुनें ज्ञान गर्हणीय मानण्यात आलें. पण परिणाम काय झाला? पूर्वी जसें तत्त्वज्ञान फक्त धर्मगुरूलाच माहीत असावयाचें आणि तो सांगेल तें प्रमाण मानून सर्वांनीं डोळे मिटून ऐकून घ्यावयाचें त्याप्रमाणें आजहि शास्त्रज्ञांनीं ज्ञान पैदास करावयाचें व नवीन नवीन सुखसाधनें शोधून काढावयाचीं; आणि आम्हीं बाकीच्यांनीं ते सांगतील तें खरें मानावयाचें व देतील तीं उप-करणीं अंधपणें उपभोगायचीं असा हा प्रकार सर्वत्र चालला आहे. हा जो दोष येतो तो भौतिक शास्त्रांना नाहीं. तीं शास्त्रें सर्वांस सुलभ आहेत; पण अभ्यास करील त्याला. इतरांना नाहीं. त्या शास्त्रांच्या वाटेस जातो कोण? हा आमच्या मनोवृत्तीचा दोष

आहे. सांगावयाचें एवढेंच कीं भौतिक शास्त्रांचा प्रसार होऊन आमची मनोवृत्ति पूर्वीचाच कायम आहे. किंबहुना हे शास्त्रज्ञ नवीं नवीं उपकरणीं पुढें करून आम्हांस आळशी बनवीत आहेत. इतर सोयी यंत्रानें होतातच. पण आपल्याकरितां विचार करणारे सुद्धां निराळे तज्ज्ञ आहेत तेव्हां बुद्धि वापरण्याचीहि आम्हांस आतां आवश्यकता राहिली नाहीं. अशा तऱ्हेनें यंत्राच्या साह्यानें आपला बराच वेळ वांचून बुद्धि व शरीर हीं दोन्ही रिकामीं राहिलीं आणि ‘ An empty mind a devil's workshop ’ या न्यायानें आणि साधनसुलभतेनें आमची प्रवृत्ति गुन्ह्यांकडे वळूं लागली. बरेचसे गुन्हे हे अतिसंपत्तीच्या पोटीं आणि रिकामपणामुळें झालेले आहेत हें पाश्चात्त्य देशांतील गुन्ह्यांच्या अभ्यासावरून स्पष्ट होण्या-सारखें आहे. तात्पर्य, भौतिक तत्परतेनें आमच्यांत सुधारक फरक होऊं शकत नाहीं हें तर खरेंच.

संपत्ति, शास्त्रीय ज्ञान, सुशिक्षितता, यांच्या अभावीं मनुष्य आजपर्यंत खितपत पडला होता अशी समजूत असल्यानें नव्या जगानें वरील तिन्ही गोष्टी सर्वांस सुलभ करून ठेवल्या. परंतु या तिन्हींच्या प्रगतीनें मनुष्याचीं जुनीं दुःखें नाहींशीं झालीं नाहींत व नवीन येणारीं संपलीं नाहींत. फार तर एवढेंच म्हणतां येईल कीं कांहींचें स्वरूप बदललें आहे. अर्थात् वैयक्तिक आणि समष्टि जीवनाचें समाधानस्थान वरील त्रिपुरांत नाहीं हें स्पष्ट होतें. मग तें दुसरीकडे कोठें आहे काय याचा शोध केला पाहिजे. पण त्यापूर्वी कोणी असें म्हणतात कीं आमचीं दुःखें अद्याप जीं संपावयाचीं राहिलीं आहेत तीं शास्त्रांत जेवढी प्रगति व्हावयास पाहिजे तेवढी झाली नाहीं म्हणून. परंतु सुखसमाधानाची कल्पना मुळांतच सदोष आहे. मनुष्याचें मानसिक व ऐहिक समाधान भौतिक उपकरणांत आहे असें पुष्कळांस वाटतें. परंतु आत्मिक शांतींत मानसिक व ऐहिक समाधान आहे. नाहीं तर अद्ययावत् उपकरणांनीं

६६८५
६८५

सज्ज अशा पाश्चात्त्य व अमेरिकन समाजांत मानसिक अस्वास्थ्यांतून उगम पावणाऱ्या आत्महत्त्यांचें प्रमाण वाढलें नसतें आणि अलौकिक सिद्धी मिळविणाऱ्या पण ध्येयच्युत योग्यांस सामान्य मनुष्याप्रमाणें दुःखी व्हावें लागलें नसतें.

## सांस्कृतिक समान

भौतिक शास्त्रांचा उगम विद्याभिलाषेंत झाला असला तरी त्यांचा विकास मानवी द्वेपावर उभारलेल्या राष्ट्राभिलाषेंत होत आहे. भावी काळांत राष्ट्रीय राजकारणापासून भौतिक शास्त्रें सर्वस्वी अलिप्त राहतील असें दिसत नाहीं. म्हणजे शास्त्रें, राजकारण व त्यांतून उत्पन्न होणारी नवी सामाजिक स्थिति या तिघांचा संबंध घनिष्ट राहणार हें निश्चित. मनुष्यसमाज हा आतां राजकीय घटक होऊं पाहात आहे. 'संस्कृति' या शब्दाला आतां स्वतंत्र अस्तित्व राहत नाहीं. राजकारणाचें जें सामाजिक स्वरूप तीच संस्कृति. तथापि संस्कृति या जुन्या शब्दांत जो अर्थ भरला आहे त्या अर्थानें मानवी समाज राजकीय घटक न होतां सांस्कृतिक घटक झाला पाहिजे. हिंदुस्थान हा राजकीय दृष्ट्या एक कधींच नव्हता. अशी अपेक्षाहि नाहीं. हिंदुस्थानचें वैशिष्ट्य तो सांस्कृतिक देश असण्यांतच आहे. नवीन उदय पावलेली व स्वतः राष्ट्राचाच नाश करणारी राष्ट्रीय कल्पना ही अनुदात्त व प्रतिगामी आहे. सांस्कृतिक शिक्षणानें जें मनुष्याचें हित होईल तें राष्ट्रीय शिक्षणांत नाहीं. राष्ट्रीयता ही परस्परद्वेषांत आणि स्पर्धेतच जगणारी असल्यानें चिरकालीन हित हें शक्य नाहीं. विशिष्ट कालानंतर आळीपाळीनें अधःपात हें ठरलेलें आहे.

अनुक्रम १५४८८
विभाग २०.मि
क्रमांक ६५०

REFBK-0006845